
# चैतन्य लहरी

जानेवारी – फेब्रुवारी २००३
अंक क्र. १, २











# अनुक्रमणिका


ध्यानी-मनी-स्वप्नी....................२

संक्रांती पूजा,१४ जानेवारी २००३ मुंबई....................३

विवाहापूर्वी नवरदेवांना उपदेश गणपतीपुळे २९.१२.०२....................४

ख्रिसमस पूजा, गणपतीपुळे २५ डिसेंबर ०२....................५

गणपतीपुळे सेमिनार वृतांत ....................७

वैतरणा पूजा, दिनांक ३१ डिसेंबर ०२ ....................११

सर श्री सी.पी.श्रीवास्तवसाहेबांचे भाषण, वैतरणा....................१२

वैतरणा सोहळा वृतांत ....................१३

दिवाळी पूजा अमेरिका, ३ डिसेंबर ०२....................१५

वाणीचे प्रकार आणि मंत्र, प्रतिष्ठान पुणे १९८८....................१९

आत्मसाक्षात्कारी संत सूरदास....................२३



चैतन्य लहरी, सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्व्हे नंबर ९८, भुसारी कॉलनी , कोथरुड, पुणे -४११ ०३८

टेलिफोन : ०२०-५२८६१०५, ५२८०६६८ इमेल : chaitanyalaharipune@rediffmail.com



# ध्यानी-मनी-स्वप्नी

तिसऱ्या सहस्रकातील पहिली दोन वर्षे पूर्ण करुन तिसऱ्या वर्षात आपण नुकतेच पदार्पण केले आहे. तिसरे सहस्रक सहजयोगाचा उज्ज्वल भविष्यकाल ठरणार आहे व समस्त मानवजातीमध्ये संक्रमण घडणार आहे हे भाकित फार पुरातन कालापासूनच जाहीर आहे हे आपण सर्वजण जाणतोच. एवढया विस्तीर्ण भविष्याचा आढावा सामान्य मानवाच्या आटोक्यात येणे कठीण भासेल. तरी आपण प्रत्येक सहजयोगी आणि यापुढे सहजयोगात येणारे सर्व पुण्यात्मे हेच या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार ठरणार आहेत याचे भान आपल्यामध्ये सदैव जागृत ठेवणे व त्यानुसार कार्यान्वित राहणे हेच आपण प.पू.श्रीमाताजींचे सुपुत्र म्हणून आपले प्रथम कर्तव्य ठरते.

कुंडलिनी जागरण हे बीजाला अंकुर फुटण्या-सारखे आहे हे आपण जाणतोच. याच अंकुराचा महावृक्ष बनुन त्याच्या अनंत बीजांपासून पुन्हा अनेक वृक्ष तयार होणार आहेत. सृष्टीचे निर्मिती कार्य हे असेच अखंडपणे चालत आले आहे. आंब्याची कोय पेरली व त्याचा वृक्ष बहरला की त्याला मधुर आंबेच लागणार. आंबट-कडू निंब येणारच नाही. अशा अर्थाचे संत कबीरांचे एक वचन आहे.पंचमहाभूत तत्वे आपआपल्या परीने त्या कार्याला हातभार लावत असतात. जरा दूर जाऊन निसर्गाच्या कुशीत शिरल्यावर निर्विचार अवस्था जाणवते व हे लक्षात येते.

सहजयोगाच्या कार्यालाही निसर्ग नेहमीच सहकार्य करत असतो याची अनेक उदाहरणे श्रीमाताजी सांगत असतात. पूजा-हवना सारख्या प्रसंगी पाऊस पडण्याचे थांबणे, हे याचेच द्योतक आहे. समुद्रामधून बोटीने सहजयोगाच्या प्रचाराच्या कार्यक्रमाला जाताना वादळी पावसाची चिन्हे पाहून एका सहजयोग्याने पर्जन्यदेवतेची प्रार्थना केली आणि कार्यक्रम करुन परत येईपर्यंत पाऊस पडला नाही. ही कथा श्रीमाताजींनीच बऱ्याच वेळा सांगितली आहे.या सर्वांचा मतितार्थ हाच की, सहजयोगाचे कार्य हे परमेश्वरी कार्य असल्यामुळे सारी पंचमहाभूत तत्त्वेही त्याला मदत करण्यास सिध्द असतात. आपण सर्वांना फक्त त्या कार्याचे दूर परमचैतन्याचे वाहक बनायचे आहे.

या विचाराचे भान जागृत ठेवण्यासाठी सहजयोगाची पाळे-मुळे आपल्या व्यक्तिमत्वामधे खोलवर व दूरदूर पसरवून आपल्या अध्यात्मिक उन्नतीमधून मानवजातीलाही अधिक अधिक कल्याणकारी मार्गावर आणण्याचा प्रयत्न आपण सातत्याने केला पाहिजे. प्रापंचिक व विहित जबाबदारी पार पाडतानाही हा विचार आपल्याला सतत प्रेरणा देणारा ठरतो. ‘ ध्यानी-मनी-स्वप्नी’ आमच्या मनात सहजयोगच असू देत अशी आपण प.पू.श्रीमाताजींच्या चरणी प्रार्थना करु या.





## संक्रांत पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण
१४ जानेवारी २००३ मुंबई

**ज्याप्रमाणे सूर्य आपल्या सर्वांना प्रकाश देतो त्याप्रमाणे आपण सर्वांना आपल्या आतील प्रेमशक्तीचा प्रकाश दिला पाहिज.**

आजच्या पूजेचे कारण आपल्या सर्वांना माहीत असेल की सूर्य ज्यावेळी आपली कक्षा बदलतो त्यावेळी आपण ही संक्रांत पूजा करतो. कारण संक्रांत पूजेच्या माध्यमातून आपण सर्वजण सूर्याची पूजा करतो.आजच्या दिवशी सूर्याने जी आपली कक्षा बदलली आहे त्यामुळे आजपासून बदल घडवून आणणार आहे. त्यामुळे आपले संरक्षण होणार आहे. त्यामुळे फळे, फुले प्रत्येक प्रकारच्या गोष्टीत बदल होणार आहे. हे सर्व सूर्यामुळे होते त्यामुळे या संक्रांत पूजेला महत्व आहे.याचबरोबर असे म्हणतात की आजपासून आपले कर्म बदलते,त्याचबरोबर कर्माची फळे बदलतात,आपले नशिब बदलते, आपले भविष्य बदलते. या दृष्टीने पाहिले असता मला असे वाटते की, आपण सर्वांनी सूर्याची पूजा करुन त्याच्या विषयी श्रध्दा, भक्ती वाढवण्यासाठी पूजा केली पाहिजे.याबाबतीत लोकांनी अत्यंत सावधान राहिले पाहिजे. ही पूजा हे सर्व याचे प्रतिक असून आपण हे सर्व पूजेतून व सूर्याल समर्पित करतो.

आता या संपूर्ण वर्षात सूर्याच्या कृपादृष्टीने विश्वरुतु येईल त्यामुळे आपल्यावर सूर्याची मेहरबानी होईल. जर सूर्य जास्त गरम झाला तर आपल्याला मोठे नुकसान होईल. त्यामुळेच आपल्या देशात सूर्यपूजेला महत्व आहे. उत्तरेकडील बरेचसे लोक सूर्याला मानतात पण आपल्या महाराष्ट्रासारखी पूजा करीत नाहीत.कारण याठिकाणी प्रकोप जास्त होत असतात. सूर्य जास्त आल्यामुळे प्रकोप होतो. त्यामुळे फळे -फूले यांचे मोठे नुकसान होते सूर्यामुळेच आपले जीवन चालते. त्यामुळे आपण या पूजेतून सूर्याला वरदान मागतो की, आमचे रक्षण कर. यासाठीच सूर्याची पूजा करणे आवश्यक आहे.

आपल्या धर्माचे लोक ग्रामिण भागात जसे जनावरांवर अवलंबून असतात. आम्ही सर्वजण हे मानतो की आमचे जीवन सूर्यामुळेच चालते.त्यामुळेच त्याची प्रशंसा करणे आवश्यक आहे. प्रशंसा करण्यासाठीच त्याचीही पूजा करणे आवश्यक आहे.परंतु उत्तरेकडील लोक इतके सूर्याला मानत नाहीत त्यामुळेच तीकडे मोठयाप्रमाणावर प्रकोप होत असतो.त्यामुळेच ही एक प्रथा पडली आहे. एक प्रकारे ती चांगली प्रथा आहे.निसर्गाला मानतो हे चांगले आहे. सर्व काही निसर्गाच्या कृपेतून घडत असते हे मानणे चांगले आहे.जर निसर्गाची कृपा नसेल तर खूप अडचणी येऊ शकतात. त्यामुळे निसर्गाकडे लक्ष दिले पाहिजे त्याची पूजा केली पाहिजे.त्यामुळे या पूजेतून सर्वकाही त्याला समर्पित करतो या दृष्टीकोनातून ही पूजा केली जाते.

महाराष्ट्रात संक्रांत फार मोठया प्रमाणावर मानतात. तसे आम्ही संक्रांत पूजेला जास्त महत्व देत नाही त्यामुळे पूजा जास्त मोठया प्रमाणावर करीत नाही. पण मुंबईतील लोक म्हणाले की, ही पूजा मुंबईत करावी म्हणून आज ही पूजा आहे. आपण लोकांनीपण सूर्याला मानले पाहिजे त्याची पूजा केली पाहिजे. शरीराला व्यायामासाठी स्वास्थ्यासाठी आपण सूर्यनमस्कार करतो त्यामुळे आपले शरीर तंदुरुस्त व निरोगी बनते. त्यादृष्टीने पाहिल्यास सूर्याला फार महत्व आहे.त्यासाठी त्याची पूजा क रायला पाहिजे.

सुर्याच्या मुळेच ढग येतात. पाऊस येतो सर्वकाही होते. आपला देश हा शेतीप्रधान आहे.त्यामुळेच आपल्याकडे सूर्याला फार मानतात. आणि आपण सर्वांनीपण सूर्याला मानले पाहिजे कारण



सहजयोगात सुर्यनाडीला फार महत्व आहे. सूर्यनाडी चांगली जबरदस्त सूर्यामुळे होते. त्यामुळे आपली कार्यशक्ती वाढते, कार्यशील होते. सुर्यच्या प्रभावामुळेच ही कार्यान्वित होते. त्यामुळे आपण सूर्याला प्राथना करतो की तुमची शक्ती आम्हाला द्या,आम्हाला आशीर्वाद द्या की आमच्यात कार्यशक्ती वाढवा पण आमच्यात ईगो वाढवू नका. कार्य करवून घ्या. दुसऱ्यांना त्रास देण्याचे, कोणावर जबरदस्ती,आधिपत्य गाजवण्याचे आमच्याकडून घडू देऊ नका. आपल्या देशातील लोक जेवढे सुर्याला मानतात तेवढे परदेशातील लोक मानत नाहीत. काही ठिकाणी अशा गोष्टी आहेत त्या आपल्या संस्कारात नाहित. काही ठिकाणी नको एवढे मानतात ते मूर्खासारखे सुर्याच्या उन्हात २४-२४ तास बसून राहतात. ही अतिशयोक्तीच झाली.एवढे करायचे काही जरुरी नाही.नेहमी कार्य केले पाहिजे, नेहमी नम्र असले पाहिजे, स्वत:ला जास्त समजू नये, जास्त डोके चालविण्याची आवश्यकता नाही जे जास्तच स्वत:ला समजते असे समजतात त्यांच्यात इगो येतो, अहंकार निर्माण होतो त्यामुळे त्यांचेच नुकसान होते.

आजच्या पूजेमध्ये आपण सूर्याला वरदान मागितले पाहिजे की ज्या प्रमाणे आपल्याला सूर्य सर्वकाही देतो त्याप्रमाणे आपले कार्य वाढविले पाहिजे. आपल्या प्रेमातून दुसऱ्यांना सुख, आनंद देता आला पाहिजे.ज्याप्रमाणे सूर्य आपल्या सर्वांना प्रकाश देतो त्याप्रमाणे आपण सर्वांना आपल्या आतील प्रेमशक्तीचा प्रकाश दिला पाहिजे.तसे आपल्याकडे सर्वत्रच सूर्याला मानतात परंतु महाराष्ट्रात तर जास्तच मानतात कारण हा शेतीप्रधान देश आहे.माणसाला अहंकारामुळे फार त्रास होतो. ज्या ठिकाणी अहंकार आला त्याठिकाणी डोके (खोपडी)खराब होणारच. म्हणूनच सूर्याचा कस हा अहंकार आहे त्यापासून दुर राहिले पाहिजे तसे होऊ नये म्हणून सर्वांनी पाहिले पाहिजे.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

## विवाहापूर्वी नवरदेवांना श्रीमाताजींचा उपदेश
## गणपतीपूळे दि. २९डिसेंबर २००२

ईश्वरांचे तुम्हाला आशीर्वाद, आपण सर्व येथे विवाहासाठी मोठ्या संख्येने उपस्थित आहात याची मला अपेक्षा नव्हती. सहजयोगात तुम्हावर एक विशेष जबाबदारी आहे. लग्न करायच्या आधी विचार करा, लग्नानंतर तुम्ही वेडेवाकडे वागलात किंवा चुकीच्या गोष्टी केल्यात तर ती तुमची जबाबदारी आहे. तुमचे लग्न एकदा बरखास्त झाल्यावर सहजयोगात तुम्ही पुन्हा लग्न करु शकणार नाही. गणेशांच्या आशीर्वादासाठी तुम्ही योग्य असायला हवे. सर्वांनाच सहजयोगात लग्न करता येत नाही. मूर्खपणाच्या सर्व कल्पनांना दूर करा. तुमची वर्तणूक चांगली असेल, उत्तम चारित्र्याचे असाल तरच सहजयोगात लग्न करा. तुमचे तुमच्या पत्नीवर पूर्णतया प्रेम असावे, पूर्ण विश्वास असावा व जे जे शक्य आहे ते तुमच्या क्षमतेप्रमाणे तिला द्या.

तुमचे संबंध योग्य ठेवा. सहजयोगात लग्न होणे साधे नाही. तो तुमचा मोठा आधार असेल व ते माझे आशीर्वाद असतील. जर तुम्ही कमकुवत, क्षुद्र वृत्तीचे व त्रासदायक वागाल तर तुमचे लग्न मोडेल आणि मग सहजयोगाच्या बाहेर फेकले जाल. तर आत्ताच काय ते ठरवा. तर निश्चयी व्हा. आधिच विचार करा व उत्तम पती व्हायचे ठरवा. पत्नीची व कुटुंबाची काळजी घ्या व सहजयोग अंगी बाणा.

आजचा सोहळा तुम्हाला व आम्हा सर्वांना एक विशेष असा आहे., इतर लग्नासारखा नाही.तुम्हाबद्दल जे ठरविले त्याचा स्विकार करा, मान्यता द्या, सहजयोगातील काही विवाहच बाद ठरले, ते पूर्णतया बरबाद झालेत. तर सहजयोगात परिपक्व व्हा आणि आदर्श कुटुंब प्रस्थापित करा, सुयोग्य पती व्हा. आपल्यात अनेक विशेष व्यक्तीमत्वाचे व विशेष नातेसंबंधाचे लोक आहेत. सहजयोगातील लग्न हे इतर बाहेरील लोकांसारखे मूर्खपणाच्या कल्पनांसारखे नाही. याबाबत तुम्ही स्वत: विषयी ठाम असा आणि सहजयोगातील लग्ने म्हणजे विशेष आहे हे इतरांना दाखवा, ती आदर्श ठरावीत, तसे तुम्ही वचनबध्द रहा.

आपणा सर्वांना धन्यवाद.



# ख्रिसमस पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण
२५ डिसेंबर, २००२ गणपतीपूळे

**श्री ख्रिस्तांच्या जीवनातून, जगाच्या आजच्या समस्याकडे पहा. त्या निराकर करण्यासाठी जगाला आज तुमची जरुरी आहे**

सहजयोगानुसार ख्रिस्तांचे स्थान तुमच्या आज्ञाचक्रावर स्थित आहे. त्यांच्या संपूर्ण जीवनातून आत्मसाक्षात्कारी महात्म्याचे गुण प्रकट झालेत. त्यातून त्यांना हेच सुचवायचे की तुमच्यात कसल्याही प्रकारची वासना वा हाव (greed) नसावी. आज जगात लोक एवढे लोभी पाहून धक्काच बसतो. अगदी लहान पणापासूनच बालवयात याची सुरवात होते. अमके हवे तमके हवे, ही हाव अशीच वाढत जाते की कधीही त्यांचे समाधान होत नाही. फक्त पूर्ण समाधानच तुम्हांला संतुलन प्राप्त करुन देईल ज्यामुळे तुम्ही असल्या गोष्टीपासून दूर रहाल.

भारतासारख्या देशात पाश्चात्य वृत्ती वाढत आहे व लोकही अधिक लोभी झालेत. प्रत्यक्ष अमेरिकेत लोक हे सर्व मिळवून त्यांना कुठलेच समाधान प्राप्त झाले नाही आणि आता ते अध्यात्माकडे वळु लागले. पण आपण ख्रिस्ताच्या जीवनाकडे पाहिले पाहिजे. ज्या देशात त्यांचा आदर केला जातो तेच देश तेथील लोक नुसते पैशाच्या मागे आहेत, एवढेच नाही तर त्याचा गर्व करतात आणि गळ्यात क्रॉस घालून हिंडतात. ज्या क्रॉसवर खिस्तांनी आपला अंत स्विकारला, ते त्यांनी आपल्या गळ्यात का घालावे? हा सर्व दांभिकपणा आहे आणि त्यांच्या वासना व हवरेपणाला काही सीमाच राहिली नाही. आणि भारतातही या गोष्टीचे अनुकरण व्हायला लागले. पण अमेरिका सारख्या देशात जेथे भ्रष्टाचार नव्हता, तेथे लोक संपत्तीच्या मागे लागले, मालमत्ता वाढवू लागले., जे लोक स्वत:ला ख्रिस्तांचे अनुयायी मानतात. भारत जो एकवेळ संताचादेश म्हणत तेथेही लोक हावरेपणाच्या अगदी खालच्या स्तरावर पतित झालेत. या लोकांना हे वागणे समजणे अशक्य आहे, जे ख्रिस्तांच्या तत्वा विरुध्द आहे.पण जे ख्रिस्ताला मानतात ते पण या हवरटपणाच्या आहारी गेलेले दिसतात.

खिस्त हे महान प्रेषित होते. त्यांची त्यागवृत्ती मोठी होती. ते स्वत: गरीब परिस्थितीत जगले. त्यांचे जीवन फार अल्प होते, कष्टमय होते. तसे असावे असे कोणालाही नकोय. जे पैशाच्या मागे धावतात ते ख्रिश्चन नाहीत. या देशात ख्रिश्चनांच्या कारवायांबद्दल बरेच काही ऐकू येते. ते इतर लोकांचे धर्मांतर करुन ख्रिश्चन बनवतात. याउलट ख्रिस्तांनी लोकांत परिवर्तन घडवले, लोकांचे धर्मांतर केले नाही. मला सहजयोग्यांची काळजी वाटते, ते असे असहज वागणार नाहीत, खिस्तांच्या विरोधात . सहजयोगातील तत्वानुसार तुम्ही लोकांना मदत केली पाहिजे, की जे निराधार आहेत.तुम्ही त्यांना आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे. तुम्हांला आत्मसाक्षात्कारातून लाभलेल्या शक्तीमुळे तुम्ही उन्नत होऊन लोकांना मदतीची भावना वाढवून तुम्ही आपल्या देशाला, सर्व विश्वाला वाचवू शकाल. ही मदतीची भावना, आतून तो तुमचा स्वभाव बनला पाहिजे.

महाराष्ट्रात अनेक पुढारी, त्यागी व उदार होते. आणि स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला झोकून सर्व काही त्याग केला. पण आजचे चित्र पाहिले तर त्यांचीच मुले सत्ता व पैसा जमवण्याच्या मागे लागलेली दिसतात. तसेच जी राष्ट्रे ख्रिश्चन आहेत ती या ख्रिस्तांचे अनुकरण करत नाहीत. ज्याची 'त्यागवृत्ती' हाच प्रथम आदर्श होता.याचा अर्थ असा नाही की आपल्या उदरनिर्वाहासाठी पैसा कमवायचा नाही पण जे काही आपण मिळवतो त्यातूनच काही त्याग आपण केला पाहिजे. सहजयोगी हे पूर्ण प्रेमळ व दयाळू असले पाहिजेत,तसे नसतील तर ते सहजयोगी नव्हेत.लोकांचे प्रश्न



समजून जास्तीत जास्त लोकांना मदतीचा हात दिला पाहिजे. त्याच ख्रिस्तांच्या मार्गावर आपण आहोत, हे अजून काही सहजयोगी जाणत नाहीत. त्यांच्या त्यागवृत्तीची आपण जाणीव ठेवली पाहिजे. हे आपली आज्ञा वरील (पकड) दूर करण्यासाठी व अहंकार कमी करण्यासाठी आवश्यक आहे. त्याविरुध्द आपण झटले पाहिजे. त्यांच्या जीवनाचा हाच महान संदेश आपण सर्व आत्मसाक्षात्कारी लोकांसाठी आहे.

माझे चित्त नेहमी गरजू व निराधार लोकांकडे ओढले जाते. विशेषत: सोडलेल्या व निराधार अशा स्त्रियांच्या साठी, दिल्लीत त्यांच्या विस्थापनेसाठी एक संस्था, तयार केली आहे. त्यासाठी लागणारा बराचसा फंड मी उभा केला आहे. निराधार अशा स्त्रियात मुस्लीमांची संख्या जास्त आहे. अशांना हृदयातून, नि:स्वार्थपणे मदतीसाठी सर्व मानवजातीसमोर हे उघड करायला हवे. सहजयोग्यांनीही स्वत:पुरते न पहाता ते त्यांचे कर्तव्य आहे की गरजूंना मदत करण्यास पुढे सरसावले पाहिजे. मग सहजयोग्यांनी आम्हाला मदतीचा हात दिला, असे ते म्हणू शकतील. सहजयोग्यांनी अशा निराधार लोकांसाठी झटले पाहिजे.गरीब लोकांच्या समस्याकडे पाहून माझे हृदय पिळून निघते. तुम्हीच त्यातून काही मार्ग काढून त्यांना मदत कराल. ते तुमच्या महालक्ष्मी तत्वाच्या शक्तीतून तुम्ही करु शकता. तुम्ही बाहेर पडा व जरी ते सहजयोगी नाहीत तरी त्यांना मदतीचा हात द्या जे हालाखित राहतात.

श्री ख्रिस्तांचे जीवन अत्यंत हालाखीचे व कष्टप्रद होते, तसे तुमचे जीवन असावे असे नाही पण तुम्ही गरीब व गरजू व निराधार लोकांच्या मदतीसाठी तुमच्यात करुणा असावी. त्यांच्यासाठी काय करु शकतो हा विचार करा. आपण सर्व सहजयोगी आहोत व संतांनी जसे (समस्यांना)तोंड दिले तसे आपण दिले पाहिजे, त्या सोडवल्या पाहिजेत. आज आपण श्रीख्रिस्तांचा जन्मदिन साजरा करतो, हा मोठा आनंदाचा दिवस आहे. त्यांचे जीवन फार खडतर व कष्टप्रत असले तरी त्यांच्यामधील त्यागवृत्तीच त्यांच्या प्रेमशक्तीचा गौरव केला पाहिजे. असे बरेचसे सहजयोगी आहेत. पण अजूनही बऱ्याचजणांची हाव सुटत नाही. उदा. अमेरिकेतील एका कॅारपोरेटरने स्वत:च्या मालकीची २१ विमाने व ५० मोटारगाडया जमवील्या. त्याला वाटत होते मी फार वैभवात आहे, मजेत आहे पण ते सर्व त्याला गमवावे लागले जेव्हा ते सर्व जप्त करण्यात आले. हे सर्व संग्रही वृत्तीमुळे घडते. अशा अत्यंत हावरेपणा असणाऱ्या लोकांच्या बाबतीत हे घडते व एके दिवशी हे सर्व मालमत्तेला त्यांना मुकावे लागते. तसेच एक वयस्कर धनिकाने एका तरुण मुलीशी लग्न केले व काही दिवसांनी मागे लाखोंची मालमत्ता सोडून तो मृत झाला. मृत्यूनंतर त्याचा मुलगा संपत्तीवर हक मागू लागला. शेवटी त्या गृहस्थाची पत्नी मुलाला या संपत्तीसाठी कोर्टात धाव घ्यावी लागली. शेवटी लोकांना कधी संतुष्टता नसते. त्यामुळे पैसा व वैभवाच्या मागे पळतात हे ग्रहणीग्र आहे व त्या मधील त्याग भावना लोप पावते.

गांधीजींकडे पहा, त्यांनी गरीब व गरजू लोकांसाठी किती कष्ट घेतले, मोठा त्याग केला. लोकांनाही त्याग करण्यास भाग पाडले. आपण तसे उदार आहोत का? अशी दुसऱ्यांना मदत केली का हे स्वत:ला विचारा. ख्रिस्तांच्या जीवनाकडे पहा जरी ते गरीबीत वाढले तरी ते राजांचे राजे होते. अशा एका व्यक्तीचा आपण मार्ग स्विकारला पाहिजे. तसे बनण्याचा आपल्यातील किती लोक प्रयत्न करतात. त्या कार्पोरेटरसारखे नको कारण आपण सर्व सहजयोगी आहोत. तुम्ही किरकोळ लोक नाहीत. अशा लोकांना प्रेम व अनुकंपा दर्शवणाऱ्या गोष्टी तुमच्याकडून माझ्या कानावर पडू द्या. ख्रिस्त हे अशा तऱ्हेचे 'वैभवशाली' व्यक्तीमत्वाचे सहजयोगी होते. त्यांच्या जीवनात त्यांनी अनेक समस्यांना तोंड दिले. त्यांच्या स्वभावाचा खुद्द त्यांच्याच लोकांनी फायदा घ्यायचा प्रयत्न केला. त्यांना त्रास दिला.

एक सहजयोगी जे सहजयोगाबाहेर आहेत त्यांनी मला त्रास द्यायचा प्रयत्न केला. त्यांनी अनेक दिवस माझ्याकडून पैसे लुबाडले. अशांना आत्मासाक्षात्कारी कसे म्हणायचे ? तर तुम्ही विचार करा कशी मदत करु शकता. हे तुम्ही ख्रिस्तांच्या जीवनातून शिकू शकता. मी सुध्दा एका ख्रिश्चन कुटुंबात जन्मले पण ख्रिश्चन लोकांत सुध्दा फार हावरेपणा व क्षुद्रवृत्ती दिसून येते. लोकही या हावरट व मूर्खवृत्तींची वाहवा करताना दिसतात.सत्तेच्या मागे धावतात पदांच्या मागेधावतात ते सहजयोगी नाहीत. पण सहजयोगातसुध्दा काही लोक कंजुषी करतात व पैशाच्या मागे लागतात. मला पैसा म्हणजे काय ते कळतच नाही. मलाही फसवायचा प्रयत्न करतात. असल्या वृत्तींचा मी कधीच स्विकार करणार नाही. त्यांचा विनाश होईल हे त्यांना कळत नाही ही फार खेदाची व मूर्खपणाची बाब आहे.आपण संपत्तीच्या हावरेपणावर मात केली पाहिजे तर तुम्हांला कसल्याच समस्या उरणार नाहीत.

आपण ख्रिस्तांच्या जीवनातून धडा घेतला पाहिजे व जीवनात संतुष्टता ठेवली पाहिजे, समाधान हवे नाहीतर तुम्ही सहजयोगी कसले?आत्मसाक्षात्काराचा काय उपयोग. श्री ख्रिस्तांच्या जीवनातून जगाच्या आजच्या समस्याकडे पहा. त्यांच्या निराकरणाची जगाला आज तुमच्याकडून जरुरी आहे, अशा हृदयातून मी तुम्हाला आशीर्वाद देते.ईश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

# गणपतीपुळे सेमिनार वृत्तांत



दिनांक २३.१२.०२

सहजयोग्यांना पर्वणी म्हणजे या वर्षीचे गणपतीपुळे सेमिनार दिनांक २३ डिसेंबर ते २९ डिसेंबर २००२ या काळात संपन्न झाले. प.पू. श्रीमाताजींचे गणपतीपुळे एम.टी.डी.सी.मध्ये दिनांक २३ डिसेंबरला रात्री ११.३० च्या सुमारास आगमन झाले.श्रीमाताजींच्या गाडीसमोर फटाक्याची मनमोहक आतशबाजी केली होती. त्यामध्ये प्रामुख्याने सर्व चक्रे तसेच आतशबाजीमध्ये श्रीमाताजींच्या फोटोला हार घालणे असे वेगवेगळे प्रकार केले होते. त्याचवेळी समुद्रावर देखिल फटाक्यांची प्रचंड आताशबाजी केली. श्रीमाताजींच्या निवासस्थानाच्या बंगल्याला आकर्षक विद्युत रोशनाई केली होती. प्रवेशद्वारावर अत्यंत सुंदर अशी प्लास्टर ऑफ पारीसची कमान केली होती.सर्वत्र फुलांची सजावट आरास केली होती. त्याचवेळी सनईची मंगल धून पुण्याचे प्रसिध्द सनईवादक श्री दैठणकर वाजवित होते.अशाप्रकारे आदिशक्तीचे स्वागत करण्यात आले. त्यांच्यासोबत कल्पनादीदी होत्या.

दि.२३ ला सेमिनार पेंडालमध्ये संध्याकाळी ७.३० वा संगीताच्या कार्यक्रमाची सुरवात झाली. त्याचे सूत्र संचालन हैद्राबादचे रेड्डी यांनी केले. सुरवातीला उज्जैनच्या युवाशक्तीने दोन भजने म्हटली, दक्षिणेकडच्या एका छोट्या मुलीने दोन भजने म्हटली. नॉयडा ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी श्री जगदंबे, पुजा करे संसार, सुब्रमण्यमने गणराज रंगी नाचतो, लता धुमाळ हिने नाशिकचा जोगवा, विजयी शारदे ही भजने म्हटली. धुमाळ यांनी सिंथेसायझरवर व इस्माईल यांनी तबला अशी जुगलबंदी केली. दिपक वर्मा यांनी गुंजे सदा जयकार, श्री माँ है रंग रे, शिव भोला भंडारी ही भजने सादर केली, डॉ राजेश यांनी मेरी माँ पुनम का चाँद, डॉ सिंपल यांनी दमा दम मस्त कलंदर, व दोन नविन भजने म्हटली.शेवटी श्री अरुण आपटे गायला बसले. त्यांनी उमा उमा शिव शंकर व अबिर गुलाल ही भजने म्हटली आणि रात्री १२ च्या सुमारास कार्यक्रम संपला. आजचे सकाळचे ध्यान ६.०० वा श्री सुब्रमण्यम यांनी घेतले. आजचे स्टेजवरचे डेकोरेशन मागे समुद्र व बाजूला दोन घडे असे होते.

दिनांक २४.१२.२००२

आजची सुरवात सकाळी ६.०० च्या सामुहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सकाळी ११.००च्या सुमारास सहजयोग प्रचार व प्रसार बाबत एक सेमिनार झाले. त्यामध्ये श्री प्रधानसाहेब व डॉ बुगदे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. तसेच त्यानंतर अनेक डॉक्टरांनी त्यांचे विचार मांडले.

संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरवात सायंकाळी ७.०० च्या सुमारास झाली सुरवातीला तीन महामंत्र घेतले. नंतर श्री प्रधान साहेबांनी कार्यक्रमाच्या संचालनाची सुत्रे हातात घेतली. प्रथम ट्रस्टी श्री राजेश शहा यांनी सेमिनारसाठी केलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली. तसेच सर्व कमिटी प्रमुखांची नावे पुढीलप्रमाणे जाहिर करुन त्यांनी केलेल्या कामाची माहिती दिली.

मेन प्रोग्राम कोऑर्डिनेटर-श्री राजेश शहा, श्री राजेंद्र पुगालिया , श्री पराग राजे, श्री हरी जलान, विद्युतपुरवठा व साऊंड सिस्टीम - श्री एन.एस.जगताप मुंबई, सेमिनार को-ऑर्डिनेटर-श्री करुण सांधी कलकत्ता व श्री आदित्य गुप्ता वाराणशी, युवाशक्ती को ऑर्डिनेटर-श्री शेखर परब मुंबई, रजिस्ट्रेशन - श्री पराग राजे मुंबई, फॅारेनर रजिस्ट्रेशन - श्री एस शर्मा मुंबई , टेन्ट अॅरेंजमेंट - श्री नितीन शिंदे पुणे, श्री व्ही.एम कामठे मुंबई,श्री जे. चिवटे मुंबई, श्री विचारे बदलापूर, डॉक्टर कॅम्प-श्रीमती स्मिता बुगदे मुंबई, सिक्युरीटी - ले.कर्नल वाय.डी.माने पुणे, ले.कर्नल मलिक दिल्ली, श्री अहीवाल मुंबई, श्री धोत्रे पुणे, प्रसाद व तिर्थ वाटप - श्रीमती अनिता देवकर आणि सहकारी पुणे, एम.टी.डी.सी.श्रीमाताजी बंगला सजावट - श्री अजित रणावरे पुणे, एम.टी.डी.सी.रुम्स, फॅारेनर ट्रान्सपोर्टेशन - श्री जगदिश भटनागर मुंबई, एम.टी.डी.सी. कमिटी- श्री प्रकाश रणसिंग पुणे, स्टॅाल बुकिंग-श्री भाऊसाहेब जाधव पुणे, किचन व्यवस्था- श्री निक्कू आणि सहकारी दिल्ली, मॅरेज व्यवस्था श्री एस.एस.शुक्ला नासीक, गणपतीपुळे




व्हिलेज को ऑर्डिनेटर - श्री गजा पाटील गणपतीपूळे, पाणी पुरवठा -श्री दिनानाथ पाल आणि श्री पित्रे पुणे,स्वच्छता व्यवस्था-श्री प्रशांत गाडेकर पुणे, फॉरेनर्स लेडिज ॲकोमोडेशन - श्रीमती माधूरी माने पुणे, साईट ऑफिस इंचार्ज - श्री डि.झेड. भांबरे, ऑनाउंसमेंट -सौ. शरयु गडकरी पुणे. तसेच या वर्षाच्या सेमिनारला १८ वर्षे झाली.


कार्यक्रमाची सुरवात पुण्याचे श्री. बागडदे आणि सहकारी यांच्या भजनाने झाली.हे निर्मल मॉ हे निर्मल मॉ, नानक मोहंम्मद इब्राइम, नजरमे तु बहारी कदम है, जय दुर्गे दुर्गती परिहारीणी व शेवटी नान स्टॉप गोंधळ - माझ्या निर्मला आईचा कसा सोहळा साजतो सादर केले.लातुर ग्रुपने केवळ हे ब्रम्ह आत्म निरानंद, चला मंदीर आली आली माता मंदिरी, श्री मॉ के दर्शनसे मेरी धन्य हुई है काया, निर्मल नाम को जपले प्राणी, बनेगे बिघडे काम ही भजने सादर केली.


त्यानंतर रोहीत सरकार यांनी गीटारवर राग मालकंस वाजवला. रात्री १० च्या सुमारास श्री जयतीर्थ मेवंडी गायला बसले. त्यांनी सुरवातीला राग बसंत बहार गायला. बोल गणक गणक छाये बदरिया घन घन बाजे पायलीया नंतर पुरीया रागातील एक बंदिश गायला. रात्री ११.०० च्या सुमारास प्रसिध्द गायक अजित कडकडे गायला बसले. त्यांच्या लग्नाचा आजचा २५ वा वाढदिवस असल्याने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यांनी सुरवातीला नैय्या करे पार हे भजन म्हटले. त्यानंतर रात्रीचे १२.०० वाजले होते. त्यामुळे नाताळची गाणी (कॅरोल) म्हटली. नंतर कडकडे यांनी विठ्ठल बोलावे नाचे पुढे पाऊल टाकावे, हरी के भजन विना, वृंदावनी वेणू नाचे ही भजने सादर करुन कार्यक्रमाची सांगता केली.


दिनांक २५.१२.०२


आजच्या पुजेच्या दिवशी सकाळचे सामुहिक ध्यान ७.०० वा झाले. संध्याकाळी ७.३० वा कार्यक्रमाला सुरवात झाली. सुरवातीला संजय तलवार यांनी हमरे जीवनमे आई बहार माता तेरे उपकार, श्रीमती छायाने हे भवानी भगवती मॉ तुझे नमो तुझे नमो, कुमारी आकांक्षा व छायाने मिळून ऐ मन मॉं के शरण मे रहियो रहियो, संजय तलवार यांनी सिटींग इन द हार्ट ऑफ दि युनिव्हर्स, सिप्पल यांनी ऐसे वरदान दे दो हमे मॉ, डॉ राजेश यांनी सिमर मना सिमर मना मॉं का नाम सदा, दिपक वर्मा यांनी करुणामयी मॉ आपका हमको सदा आधार हो, सुब्रमण्यम यांनी मेरी दुनिया है मॉ तेरे चरणोमे, श्री श्रीखंडे यांनी हे आदि मॉ हे अंती मा , शेवटी श्री अरुण आपटे यांनी ओम त्वमेव साक्षात श्री जीझस मेरी माता हा मंत्र गायला, आणि अबिर गुलाल हे भजने सादर केले. त्यानंतर १० च्या सुमारास ढोल- लेझिमच्या जोशात श्रीमाताजींचे आगमन झाले. त्यावेळी स्वागतपर गीते म्हटली. त्यावेळी श्रीमाताजींनी सर्वांना मार्गदशन केले. प्रत्यक्ष पुजा रात्री १०.३० च्या सुमारास सुरु झाली. त्यामध्ये पेंडॉल मधील जवळ जवळ सर्वच ५ ते ८ वर्षाच्या मुलांनी श्रीमाताजींची चरणपुजा केली.पुजेच्या वेळी गणेश स्तुती, हेमजा सुतम, ख्रिस्तांची कॅरोल सॉंग, जागो सवेरा आया है, तुझ्या पुजनी, हासत आली, विश्ववंदीता ही भजने झाली. शेवटी आदिशक्तीचे पुजेतील दर्शन रात्री १२ च्या सुमारास झाले.अर्ध्या तासानंतर नॅशनल प्रेझेंटेशनचा कार्यक्रम सुरु झाला. त्यावेळी दिल्लीचे बासरीवादक बासरी वाजवत होते.शेवटी रात्री २.४५ च्या सुमारास कार्यक्रम संपला.















दिनांक २६.१२.०२

नेहमीप्रमाणे आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळच्या ७.०० च्या सामुहिक ध्यानाने झाली.संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरवात नासिकच्या श्रीमती शुक्ला यांच्या गायनाने झाली.नेपाळ कलेक्टीव्हीटीने माता तू ही माता तूही पिता हे भजन नृत्य करीत सादर केले. त्यानंतर यु.पी.चे श्री सचीतानंद सोनी यांनी मृदंग वादन केले . त्यामध्ये त्यांनी तीन महामंत्र, तीन नाड्यासाठीचे मंत्र मृदंगाच्या बोलातून सादर केले. ज्योती सरकार कलकत्ता सेंटर यांनी जागो माँ जागो, वैष्णव जन तो तेने कहिये, च्या सुमारास नविन लग्नाच्या जोडप्याची नावे अत्यंत आनंदी वातावरणात श्री नलगीरकर यांनी जाहिर केली.

दिनांक २७.१२.०२

आजचे सकाळचे ध्यान ७.०० वा झाले. सकाळी १०.३० च्या सुमारास राष्ट्रिय केंद्रप्रमुखांची मिटींग एम.टी.डी.सी. मध्ये झाली. दुपारी मुख्य पेंडॉलमध्ये सर्व लिडरची मिटींग घेतली गेली. त्यावेळी जेष्ठ सहजयोग्यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. त्यावेळी श्री नलगीरकर यांनी मार्गदर्शन केले.

संध्याकाळी ८.०० वा कार्यक्रमाची सुरवात झाली. सुरवातीला श्री व सौ आपटे यांनी तीन महामंत्र म्हटले. यमन रागात दर्शन देवो शंकर महादेव, माताजी तूही भवानी शेवटी राग पुरीया गायला.त्यानंतर सौ आपटे यांनी रेन सुखे ही पछताये काहे हे सुंदर भजन सादर केले.नंतर दुबई कलेक्टीव्हीटी गायला बसली. त्यांनी सुरवातीला गजानना श्री गणराया आदि वंदू तुझ मोरया, सहजही आपना ठिकाना है सागर के पास हमे गणपती पूळे बनाना है ही कव्वाली गायली. लखनै सेंटरच्या शिवस्तुतीवर ८-१० कलाकारांनी शिवस्तुतीवर नृत्य सादर केले. त्यामध्ये आदिशक्तीच्या जन्माचे वर्णन केले होते.त्यानंतर एका आठ वर्षाच्या मुलीने कथ्थक केले.

त्यानंतर धरमशाळेच्या कार्यक्रमाची सुरवात झाली.त्यांनी सुरवातीला श्री माँ की रेल गाडीमे निर्मल माताजी की है सवारी हे गीत अत्यंत सुंदर प्रकारे सादर केले. त्यामध्ये रेल्वे दाखविली होती. तसेच सर्व चक्रांच्या देवी देवता दाखविल्या होत्या. सदर कार्यक्रम सर्वांना अत्यंत आवडला.त्यानंतर १५-१६ जणींनी मिळून कथ्थक सादर केले.नंतर आठ-दहा मुलांनी गोंधळ सादर केला, वातावरणात विनोद निर्माण करण्यासाठी जोकर डान्स सादर केला, हिंदी लगान सिनेमातील काही दृष्ये सादर केली, पोवाडा सादर केला. सर्व धर्मातील लोकांना आपले आपले देव प्रिय असतात. त्यांना दुसऱ्या धर्माचे देव आवडत नाहीत मात्र आदिशक्तीला सर्वच धर्म मानतात अशी थिम सादर केली होती, बाबा मामांची आवडती 'अली मौला अली मौला अली अली अली श्री माताजी हमे संग ले चली' ही कव्वाली म्हटली आणि सर्व पेंडॉल नाचू लागला. शेवटी पुणे सेंटरच्या लहान मुलांनी 'सामने है सरकार फिर डर काहे का' ही कव्वाली सादर केली, बडी आशा बांधके आये है हम पास रखलो हे गीत सादर करुन आजच्या कार्यक्रमाची समाप्ती झाली.

दिनांक २८.१२.०२

सकाळी ६.०० वा सामुहिक ध्यान झाले. दुपारी ११.०० च्या सुमारास गिफ्ट वाटपाचे काम सुरु झाले ते दुपारी ३.०० पर्यंत चालू होते.संध्याकाळी ७.०० वा मुख्य पेंडॉलमधे कार्यक्रमाची सुरवात झाली.त्यामध्ये समुह नाटक सादर केले त्यानुसार कलीयुगात आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्यानंतर कुंडलिनी जसी जसी एक एक चक्र पार करते तशी तशी त्या त्या ठिकाणचे देव देवता प्रसन्न होतात, त्या चक्रांवरचा आनंद मिळतो शेवटी सहस्त्रारावर आदिशक्तीचे दर्शन होते अशी सुंदर संकल्पना होती.त्यानंतर धरमशाळेच्या मुलांनी जीझस क्राइस्ट च्या जीवनावर आधारित भव्य दिव्य नाटक सादर केले, ज्यात घेतलेल्या धरमशाळेच्या दोघी मुलींनी कथ्थक सादर केले, त्यानंतर रामायणातील सीता रावणाच्या अशोक वनात असताना हनुमान येतो हा अत्यंत जिवंत देखावा सादर केला होता. शेवटी रामायणातील राम - रावण युध्द दाखविले होते.

त्यानंतर पंडित सुरेश गोपाल श्रीखंडे गुरुजी हे गायला बसले. त्यांनी सुरवातीला गोवर्धन सांजे हरीके भजन, तराणा, हे आदि माँ हे अंति माँ ही भजने सादर केली त्यांना श्री अरुण आपटे व श्री सिंपल यांनी साथ दिली. रात्री १०.३० च्या सुमारास हैद्राबादचे कव्वाल गायला बसले. त्यांनी 'निर्मल माता की नजर' व 'अल्ला हू अल्ला हू' या कव्वाली मधे मधे शेर शायरी करीत गायली. शेवटी जगप्रसिध्द कथ्थक डान्सर श्री प्रताप पवार यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी रामस्तुती व महिषासूर मर्दीनी हा अत्यंत सुंदर प्रकार सादर केला आणि आजच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

दिनांक २९.१२.०२

आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळच्या ७.०० च्या ध्यानाने झाली. त्यानंतर १०.३० वा हळदीचा कार्यक्रम सुरु झाला.सर्वत्र लग्नाचे उत्साही वातावरण होते. संध्याकाळी ८.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे नवरदेवांच्या पेंडॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी त्यांनी सर्व नवरदेवांना मार्गदर्शन केले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणांची पुजा केली. इकडे मुख्य पेंडॉलमध्ये लग्नाची तयारी नाशिकचे श्री शुक्ल आणि नगरचे श्री अशोक चव्हाण व सहकारी यांनी मोठ्या जोरदारपणे केली होती. रात्री ९.४५ वा. श्री अरुण आपटे यांनी मारो प्रणाम हे गीत म्हटले, श्री सिंपल यांनी ना किसीसे कुछ लेना ना किसीसे कुछ देना हे गीत सादर केले.त्यानंतर प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी यांच्या निराकार उपस्थितीत लग्न समारंभाची सुरवात झाली. संपुर्ण लग्न कार्यक्रमाची जबाबदारी श्री नलगीरकर यांनी













संभाळली. मंगल अष्टके श्री व सौ आपटे यांनी म्हटली. त्यानंतर कन्यादान, मंगळसुत्र, हवन, सप्तपदी होऊन लग्न विधी पार पडला. रात्री १.०० च्या सुमारास श्री बागडदे आणि सहकारी स्टेजवर कव्वाली गायला बसले त्यांनी दिलमे दिदार  ही कव्वाली गायली शेवटी परत एकदा हैद्राबादचे कव्वाल गायला बसले त्यांनी 'माताजी माताजी माताजी' ही कव्वाली गाऊन कार्यक्रम संपला व गणपतीपूळे सेमिनारची सांगता केली.

यावेळचे डेकोरेशनमधे मुख्य कमान ही कायम स्वरुपीसाठी तयार केली होती. त्यानंतरचे मधली कमान ही अत्यंत आकर्षक केली होती. त्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर करुन वरती अष्टविनायक बाजूला नमस्कार करणाऱ्या पऱ्या असा सुंदर देखावा केलेला होता. त्या कमानींमुळे एकप्रकारची भव्यता वाटत होती.सदर कमानीचे काम पुण्याचे श्री साप्ते यांनी पाहिले होते. कमानीच्या डाव्या बाजूला मेरीमाता लहानग्या येशूला घेऊन उभी असल्याची अत्यंत सुरेख पांढरी मुर्ती तर उजव्या बाजूला झाडावर मोर व पक्षी बसलेले होते. खाली दोन हत्ती होते, तर पुढच्या कारंज्याजवळ पेग्वीन मासे दाखविले होते. सदरचे वातावरण अत्यंत प्रसन्न होते. मुख्य स्टेजवरच्या डेकोरेशनची जबाबदारी वेस्ट बंगालच्या कलाकारांनी घेतली होती.त्यामध्ये मागच्या पड्यावर रोज वेगवेगळी डेकोरेशन होती. सुरवातीला समुद्र, नंतर सर्व देव हात जोडून उभे आहेत,पुजेच्या दिवशी झोपडीत मेरी माता-लहानग्या येशूला पऱ्यांकडे देत असल्याचा देखावा होता.त्यानंतरच्या दिवशी मागच्या बाजूला उगवता सुर्य बाजूला दोन नटराज, त्यानंतर मागे वेगवेगळ्या वस्त्रांचा उपयोग करुन डेकोरेशन केले होते. वरती एका बाजूला राजा शिवछत्रपतींच्या जीवनावर आधारीत सायन सेंटरचे श्री मनोहर चंदने यांनी ३५ पोर्टेटचे प्रदर्शन भरविले होते.सर्वात महत्वाचा डेकोरेशनचा भाग म्हणजे स्टेजवर रोज अत्यंत सुंदर प्रकारच्या फुलांची रोशनाई करण्यात येत होती. स्टेजच्या डाव्या बाजूला सुरवातीला व स्टेजलगत दोन सुंदर फुलांच्या कमानी  केल्या होत्या. तसेच स्टेजच्या पुढच्या दोन्ही बाजूला फुलांची अत्यंत आकर्षक रचना असलेली सजावट केली होती. रोज फुलांचे डेकोरेशन बदलले जात  होते. तसेच रोज श्रीमाताजींच्या आसनाला वेगवेगळ्या प्रकारच्या फुलांची सजावट केली गेली.महत्वाचे म्हणजे सेमिनारला येणाऱ्या सर्व सहजयोग्यांचे स्वागत करण्यात येत होते.प्रत्येकाला पिण्याचे पाणी, तसेच फुले देवून स्वागत केले जात होते. प्रत्येकाचे लगेज घेण्यासाठी युवाशक्ती होती.प्रत्येकाला राहण्यासाठी स्वतंत्र क्रमांक दिला होता व त्या ठिकाणापर्यंत युवाशक्ती पोहचवित होती व्यवस्था श्री अशोक चव्हाण आणि सहकारी यांनी पार पाडली.सेमिनारच्या ऑरगनायझर कमिटीचे प्रमुख म्हणून श्री राजेंद्र पुगालिया व श्री पराग राजे यांनी अत्यंत सुंदर व देखणे सेमिनारचे काम पार पाडले त्यांना पुणे, नाशिक,मुंबई, जळगांव तसेच महाराष्ट्रातील सर्व भागातील सहजयोगी तसेच भारतातील  कलकत्ता, दिल्ली,आंध्र प्रदेश सह सर्व राज्यातील सहजयोग्यांनी मदत केली. अशा प्रकारे प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींच्या कृपेत सेमिनारची सांगता झाली.

●●●





# वैतरणा पूजा

प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण
दि.३१ डिसेंबर २००२

**सगळ्यात महत्वाचे म्हणजे आपल्या आयुष्यात संगीत यायला हवे. तालबध्दता असावी. त्यामध्ये एकप्रकारची रागदारी असावी**

इंग्रजी भाषणाचा अनुवाद :

आज आपण सर्व मोठया संख्येने येथे उपस्थित आहात हे पाहून खूप आनंद वाटतो. पंचविस वर्षापूर्वी ही जागा खरेदी केली होती पण काही आक्षेप घेतले गेले . त्यामुळे काही करता आले नाही पण मी याबाबत योजना करुन होते त्याला मूर्त स्वरुप आले म्हणून आज आपण येथे आहोत. आज बाबाची आठवण येणे अपरिहार्य आहे. कारण भारतीय संगीताचा, शास्त्रीय संगीताचा व भारतीय कलांचा प्रसार व्हावा म्हणून त्याने खूप मेहनत घेतली. पण आज तो येथे उपस्थित नाही याचे दुख: आहे हे आपण सर्व जाणता. कुठल्याही प्रशस्तीची अपेक्षा न करता त्याने खूप काही केले आणि हे घडण्यासाठी त्याने या सर्व आदर्शांचा उपयोग केला. त्याने आपल्या बध्दी कौशल्याने कुठलीही आढ्यत्ता न मिरवता, अगदी साध्या माणसांना हाताशी धरुन त्यांची पूर्ण काळजी घेऊन त्यांच्यातील कलाकौशल्याला योग्य आकार दिला. याच कल्पनेला धरुन मी हे संगीत प्रसाराचे कार्य पुढे चालू ठेवणार आणि मला आनंद वाटतो की त्याप्रमाणे ते घटीत होत आहे, आज तो येथे असायला हवा होता. त्याचा स्वभाव प्रेमळ आणि दयाशील आणि कधी कुणावर राग केला नाही अशी त्यांची सुंदर प्रतिमा होती.

मराठीत भाषणाचा अनुवाद :

भांडकुदळपणा हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्ये, भांडण्यात हुशार. काहीही करा त्यांच्यासाठी त्यांच्या डोक्यातून हे जात नाही, समज तर नाहीच. याचा मला अगदी कंटाळा आलाय. ही सुंदर इमारत उभी केली शास्त्रीय संगीतासाठी, त्यातही भांडण. या भांडकुदळ लोकांसाठी काहीही करण्यात अर्थ नाही. काही ना काही कारण काढून भांडत बसतात. लाज नाही लज्जा नाही त्यांना बसायला जागा नाही मिळाली त्याला आम्ही काय करणार? समजूतदारपणा नाही. या भांडकुदळ लोकांमध्ये संगीत कसे आले ते कळत नाही. ते इतके वाढले की जो येतो तो काहीना काही गाऱ्हाणे घेऊन येतो. त्यांना सहजयोगात संयम मिळाला की नाही. या महाराष्ट्रात संतांनी मोठी व्याख्याने प्रवचने दिली, त्याचा काहीही परिणाम नाही. भांडकुदळपणा काही जात नाही. त्यांच्याही नावाने भांडण. काहीतरी मूर्खपणासारखे करायचे, हा मूर्खपणा कधी जाईल हे कळत नाही.

शांतपणाने राहणे, शांतपणाने आत्मसात करणे हे समजतच नाही. लगेच ओरडायला सुरवात. परदेशी सहजयोगी म्हणतात ते असे का भांडतात. सहजयोगात तरी भांडू नका आणि थोडेसे शांतपणाने घ्या प्रयत्न करा. आपल्याला बदलायचे आहे. याचे त्यांचे खुसपट का काढता. स्वत:चे काय चुकलेले आहे ते बघा. बावाने या वेड्या महाराष्ट्रातच संगीत सुरु केले, तेही नागपूरला. नागपूरात तऱ्हेतऱ्हेचे लोक होते, तो महाराष्ट्रीय असावा असे नाही. पण लोकांनी त्याला उचलून धरले. सहजपणे कुणीतरी घ्यायचे आत्मसात करायचे, हे साधूपण घ्यायचे. पण ते सोडून पैसे मिळवायचे, गडबड करायची, हे अगदी फारच खालच्या दर्जाचे विचार होत. असे ज्या माणसाच्या मनात तो सहजयोगी कसा? त्याने काय होणार? त्यांनी उच्चस्तरीय असावे. माताजींनी आपल्याला पार केले एवढी मेहनत घेतली. तर आज निश्चय करा की आम्ही भांडकुदळपणा सोडू, यापुढे आम्ही भांडणार नाही. पैशाचा हावरटपणा धरणार नाही. तो फार आहे महाराष्ट्रात. यामुळे सहजयोगाचे काम करणे महाराष्ट्रात कठीणच आहे. आम्ही खूप मेहनत घेतली, फार काही अनुभव आलेत. तर कृपाकरुन आम्ही



सहजयोगी आहोत हे जाणून अभिमानाने रहा. त्याचा अभिमान बाळगा. भांडण्यासारखे काय आहे सहजयोगात? कुणाला बसायला मिळाले नाही, बघायला मिळाले नाही ही राजकीय मिटींग आहे काय? बोलणार नव्हते पण करणार काय? समोर दत्त म्हणून उभे. मग सांगणे जरुरीचे आहे. जे भांडकुदळपणा करतील त्यांना सहजयोगाच्या बाहेर जावे लागेल. त्याला काही इलाज नाही. सगळ्यांशी प्रेमाने वागा. एवढे जमत नसेल तर सहजयोगात कशाला आलात? आमच्या बाबाचे वैशिष्ट्ये असे की कधी कुणावर चिडायचा नाही, कधी कुणाविरुध्द ब्र काढणार नाही, न सांगता सगळ्यांची स्तुती मात्र करायचा. पण माझी दिशाभूल व्हायची. सगळ्यांची ही स्थिती कशी असे मला वाटायचे. पण बाबाने सगळ्यांना प्रेमाने वागवले मग तो कोणीही असो. कधीही माझ्या मोटारीत स्वत: बसायचा नाही. कधी माझ्या घरी जायचा नाही. तो याच महाराष्ट्रातला, पण कधी आगाऊपणा दाखविला नाही. आपण अशा एका महान व्यक्तीच्या कार्याकरीता आलात. त्यांचा काहीतरी धर्म पाळा. आता हे मंदीर उभारले येथे संगीताचे. बाहेरच्या लोकांना आपले संगीत समजत नाही पण आपले परदेशी सहजयोगी त्यांना मात्र आपले संगीत जास्त समजते. आपल्याला अजूनही समजत नाही, ताल समजत नाही काही समजत नाही. जेव्हा येथे संगीत शिकाल तेव्हा राग कुठला ताल कुठला हे माहित झाल्याशिवाय तुम्हाला संगीताचा आस्वाद घेता येणार नाही. तर माझी विनंती आहे की सर्वांनी भांडकुदळपणा सोडून आपल्यातला चांगुलपणा जागृत करणे हे सहजयोगाचे कार्य आहे. तेव्हा येथे नुसते संगीत शिकायला यायचे नाही, सहजातली वागणूक, सहजातले सर्मपण त्याच्यातले मोठेपण हे घ्यायचे. ते जर तुम्हाला घेता येत नाही तर ते काय उपयोगाचे. तशा संगीतशाळा पुष्कळ आहेत. सगळीकडे आहेत. तर तेथे शिकून डोके फोड करण्यात काय अर्थ? तर माझी अशी विनंती आहे तुम्ही संगीतावर भर द्या आणि आपल्या आयुष्यात ते भरवा व व्यवहारात आणा. ते आणल्याशिवाय या कार्याची पूर्तता होणार नाही. आजपासून व्रत घ्या, मी आजपासून भांडणार नाही कुणीजरी काही बोलले तरी आम्ही भांडणार नाही. दुसरा आजार तो पैसे खाण्याचा, सहजयोगात सुध्दा सुटत नाही. हा रोग माणसामधे कोठून आला ते समजतच नाही आणि सगळीकडे बोकाळलाय. तर आता तुम्ही बदलाल की नाही ते ठरवा. सगळ्यात महत्वाचे म्हणजे आपल्या आयुष्यात संगीत यायला हवे. तालबध्दता असावी. त्यामधे एक प्रकारची रागदारी असावी. ते न करता भांडकुदळपणा करणे हे शोभत नाही.ज्याचे त्याचे वाईट बघायचे आणि स्वत:चा चांगुलपणा मिरवायचा. झाले ते झाले. तर यापुढे अशीच माणसे पुढे आणली पाहिजेत जी समजूतदार, प्रेमळ सर्वांना जपणारी असावीत.

सर्वांना अनंत आशीर्वाद


●●●

## वैतरणा संगीत मंदीराचे उदघाटन प्रसंगी श्री सी.पी.श्रीवास्तवसाहेबांनी केलेले भाषण (सारांश) वैतरणा

कै प्रतापराव साळवे हे पहिले वकील होते. त्यांनी महात्मा गांधीच्या बरोबर स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता. त्यांनी केलेल्या कार्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांना मोठे लिडर होण्याची ऑफर केली होती पण त्यांनी ती नम्रपणे नाकारली. त्यांना संगीताची अत्यंत आवड होती. श्री माताजी आदिशक्ती असल्याचे प्रथम त्यांनी ओळखले होते. कै पी. के. साळवेंच्या मुलीने(श्रीमाताजींनी) जगात सहजयोग सुरु केला.

कै बाबा मामा हा माझा मेव्हणा होता. माझे लग्न झाले त्यावेळी तो फार लहान होता. त्याला पूर्वीपासूनच संगीताची आवड व जाण होती. सहजयोगात संगीत रुजवण्यामध्ये बाबाचा फार मोठा हातभार आहे.त्यामुळे आज त्याचा पुतळा या अॅकेडमीत उभारला हे फारच चांगले झाले आहे. सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा.






वैतरणा येथील नवीन संगित अॅकेडमीच्या जागेत पूजेची तयारी केली होती. त्यासाठी कायमस्वरुपी असलेल्या स्टेजवर पूजा ठेवली होती. सायं. ७.०० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यामध्ये सुरवातीला तीन महामंत्र व नंतर गणेश मंत्र घेतला. साधारण १५ मिनीटांनी प.पू.श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले.त्यांनी सुरवातीला सर्वांना मार्गदर्शनपर अमृतवाणी केली. रात्री ८.०० च्या सुमारास पूजेची सुरवात झाली. त्यामध्ये प्रथम गणेश स्तुती, श्री अरुण आपटेंनी हेमजा सुतम भजे,नॉयडा ग्रुपने जागो सवेरा आया है, आपटेंनी तुझ्या पुजनी अर्चनी , हासत आली निर्मला आई घालूनी पैंजन पायी, विश्ववंदिता त्यानंतर आदिशक्तीचे सर्वांना दर्शन झाले.त्यानंतर इंटरनॅशनल गिफ्ट श्रीमाताजींना देण्याचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये वैतरणामध्ये श्रीमाताजींनी १९८३ साली जी पेटी वाजवीली होती तीच पेटी त्यांना वैतरणा सेंटरने भेट दिली.तसेच नाशिक सेंटरने १९८५ साली पहिली सहज भजनाची जी सौंदणकर आणि सहकाऱ्यांनी कॅसेट काढली होती तिच्या नव्याने प्रिन्ट काढून त्याचे प्रकाशन झाले.त्याच्या विक्रीतून मिळणारी रक्कम अॅकेडमिला देणगी देण्याचे जाहिर केले.

<u>दिनांक १.१.०३</u>

आजचा दिवस हा अॅकेडमीच्या उदघाटनाचा दिवस होता. साधारण संध्याकाळी ७.०० च्या सुमारास श्री प्रधान यांनी स्टेजवर आज उदघाटन समारंभ होत असल्याचे जाहिर केले.आणि थोडक्यात प्रास्तविक केले.त्यानंतर अर्ध्या तासानंतर प.पू.श्रीमाताजींच्या हस्ते कोनशिलाचे उदघाटन झाले. त्यावेळी बाहेरच्या बाजूला लेझीमपथक जोशात वाजविले जात होते. त्यानंतर श्री माताजींचे वडील कै पी.के.साळवे यांच्या पुतळ्याचे तसेच कै बाबा मामा यांच्या पुतळ्याचे श्रीमाताजींच्या हस्ते उदघाटन झाले. तसेच म्युझिक क्लासचे श्रीमाताजींच्या हस्ते फित कापून उदघाटन झाले.नंतर श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले.त्यावेळी त्यांच्या सोबत श्रीवास्तवसाहेब व कल्पनादीदी होत्या.

सुरवातीला साहेबांनी भाषण केले. त्यामध्ये त्यांनी श्रीमाताजींच्या वडिलांबद्दल तसेच बाबा मामांबद्दलच्या आठवणी सांगितल्या. त्यानंतर श्रीमाताजींच्या अमृतवाणीत सदर अॅकेडमीबद्दल तसेच त्यांच्या वडिलांबद्दल तसेच बाबा मामांबद्दल माहिती दिली.(अंकात स्वतंत्रपणे दिली आहे) आज श्रीमाताजी सुरवातीलाच मराठीत बोलल्या. त्यानंतर म्युझिक कार्यक्रमाला सुरवात झाली.

सुरवातीला प्रधानांनी श्री श्रीखंडे अॅकेडमीचे प्रिन्सिपॉल यांचा परिचय करुन देताना सांगीतले की ते गंधर्व कुरुक्षेत्र युनिर्व्हसिटीचे चेअरमन आहेत, तसेच त्यानी आकाशवाणीवर अनेक वेळा गायन केले असून पंडित जसराज,किशोरी अमोनकर यांच्या बरोबर गायनाची साथ केली आहे. श्री श्रीखंडे यांनी सुरवातीला कर्नाटकी राग वाचस्पती अत्यंत सुंदरपणे गायला. त्यानंतर देवी दुर्गे दयानी दया करो जग जननी जनकी बेटी दया करो हे भजन गायले.

त्यानंतर सुब्रमन्यम यांनी बाबा मामांनी लिहीलेली भजने थोडक्यात म्हटली. निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती, आया हू दरबार तुम्हारे बहूत दिननका भूला भटका, तेरे चरण कमलमे रहनेवालो




मे लिखले मेरा नाम ये है सुख शांती का धाम, प्यार भरे ये दो निर्मल नैन जिनसे मिला ये अमृतमय चैन, ब्रम्ह शोधिले ब्रम्हांड मिळाले आई तुझिया धामी, लहरला सहजाचा पताका लहरला, माऊलीने ठोठावले दार, होऊनीजा आता गड्या पार, तुझ्या पुजनी अर्चनी लिन व्हावे, गुरु तोच म्हणवी खरा माझा, आवाज उठायेंगे, माताजीचे स्वप्न सहज साकारले जमला हा मेळा, वो जो सामने सजसे बैठे है, सजनी करनी जो तस्लीम हो भी चूके, वो प्यार देने को मजबूर वो प्यार पाने से मजबूर प्यार, माँ तेरे निर्मल प्रेम को मेरा शत शत प्रणाम, निर्मल नाम अती न्यारा है, त्यानंतर श्रीमाताजींनी लिहीलेले भजन माँ तेरी जय हो तेरा ही विजय हो, गायले आणि सर्वजण मंत्रमुग्ध झाले.

नाशिकचे श्री धुमाळ यांनी सिंथेसायझरवर राग कौशिक रंजनी वाजवला त्यांना तबल्याला इकबाल खान यांनी साथ दिली. साधारण तासभर ही जुगलबंदी चालली होती. शेवटी धुमाळांनी तुझ्या पुजनी अर्चनी हे भजन गाऊन त्यांचा कार्यक्रम संपविला. त्यानंतर टर्कीच्या सलीम याने सरोदवर राग दुर्गा वाजवून सर्वांची वाहवा मिळवीली.

रात्री १.०० च्या सुमारास जगप्रसिध्द सरोद वादक पंडीत श्रीमती प्रवीन शर्मा वाजवायला बसल्या. त्यांनी राग जयजयवंती वाजवला आणि त्यांच्यातील अती उच्च प्रतीच्या कलेचे प्रदर्शन सर्वांना दाखवून दिले. त्यानंतर त्यांनी तीन रागांचे एकत्र केलेले असे वादन केले. रात्री २.२० च्या सुमारास अत्यंत चैतन्यमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.


सदर अॅकेडमिची एकुण ४२ एकरचा परिसर आहे. त्यामध्ये अत्यंत देखणी इमारत बांधली आहे. तीच्या एन्ट्रन्सला दोन हॉल जे प्रिन्सीपॉल व अॅडमिनीस्ट्रेशन साठी आहेत. ग्राउंड फ्लोअरवर एक श्रीमाताजींसाठी व एक श्री साहेबांसाठी रुम आहे. तसेच संगित शिकवण्याच्या एकुण सात खोल्या आहेत. तसेच दोन्ही बाजूला दोन प्रशस्त हॉल आहेत. वरती एकुण २२ खोल्या विद्यार्थ्यां साठी तयार केल्या आहेत. शिक्षकांसाठी मागच्या बाजूला १० खोल्या आहेत. एक पाण्यासाठी विहीर आहे. व परमनंट स्टेजची व्यवस्था केली आहे. एक प्रदर्शन हॉलची निर्मीती सुरु आहे. अत्यंत निसर्गरम्य परिसरात प.पू. श्रीमाताजींचे जगभर भारतीय शास्त्रीय संगीत प्रसाराचे स्वप्न साकार करण्यासाठी तयार केलेल्या अॅकेडमिची स्थापना झाली आहे.

●●●











# दिवाळी पूजा

प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण,
लॉसएंजिल्स, अमेरिका,
३ डिसेंबर, २००२ (सारांश)

**ध्यानामध्ये निर्वीचारता स्थिती मिळविल्यानंतरच तुम्ही परमेश्वराशी जोडले जाता.**

ही दिवाळी तुम्हा सर्वांना आनंदाची व सुखाची जावो. त्यासाठी प्रथम माझ्या सर्वांना शुभेच्छा. तुम्हा सर्वांना बघुन आणि तुम्ही इतक्या चांगल्या प्रकारे सहजयोग घेतल्याचे पाहून मला फार समाधान वाटत आहे. खरे तर तुम्ही प्रत्येकजण आत्माच आहात. पण सहजयोगात उतरणे ही तितकी साधी गोष्ट नाही. तुमच्या शुध्द इच्छेमुळेच तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. एरवी आत्मसाक्षात्काराची कोणावरही जबरदस्ती करता येत नाही कारण हे शुध्द इच्छेमधूनच व तुमच्या शरणागतीमधूनच घटीत होते आणि म्हणून निव्वळ तोंडाने सांगून किंवा दुसऱ्याला पटविणाच्या प्रयत्नातून हे होत नाही. शुध्द इच्छा हीच यासाठी मोठी शक्ती आहे. म्हणूनच जगभरात इतक्या मोठ्या संख्येने सहजयोगी झाले आहेत.

आजचा दिवस फार मंगलमय झाला आहे. तुम्हाला मिळालेला हा प्रकाश आपणाला सगळीकडे पसरवायचा आहे.आणि अधिक जास्त लोकांमध्ये तो प्रकाश येईल असे कार्य करावयाचे आहे. मानवाला आत्मसाक्षात्कार मिळवून देणे हे फार महान कार्य आहे.मानवासमोरचे सध्याचे प्रश्नच त्यांना हा आत्मसाक्षात्कार न मिळाल्याने निर्माण झाले आहेत. म्हणूनच अजूनही अनेक जण अंधारात व अज्ञानात चाचपडत आहेत व आपण अज्ञानी आहोत हे पण विसरले आहेत.

सहजयोगात आल्यानंतर माणसामध्ये विवेक जागृत होऊन योग्य - अयोग्य बरोबर - चूक हा फरक त्याच्या बरोबर लक्षात येतो आणि त्या प्रकाशामध्ये तुम्ही प्रगल्भ होता. फुले जशी सुंदर आहेत तसे व्यक्तीमत्व तुमचे बनते. ही फुले जशी सदैव प्रसन्न असतात व आपला सुगंध पसरवत रहातात तसे तुमचे व्यक्तीमत्व बनते आणि मग इतर कसल्याच भौतिक इच्छा तुमच्या मनात येत नाहीत. या शिवाय दुसऱ्यालाही असाच आत्मसाक्षात्कार देण्याची शक्ती तुम्हाला मिळते. एका मेणबत्तीने जशा अनेक मेणबत्या पेटवता येतात तसे तुम्ही अनेकांना जागृती देऊ शकता आणि त्यांना आत्म्याचा आनंद मिळवून देता. तुम्हालाही याचा प्रत्यक्ष अनुभव येत आहे. म्हणून स्वत:ला आत्मप्रकाश मिळाला यावर संतुष्ट न रहाता इतर अनेकांमध्ये तो प्रकाश पोहचविण्याचे कार्य तुम्ही केलेच पाहिजे. हे केल्यावरच तुम्हाला काय मिळाले आहे याची महती कळेल आणि तुमचा स्वत:चाही आत्मसन्मान वृध्दीगत होईल. त्यातूनच तुमचे व्यक्तीमत्व एखाद्या संतासारखे संदर बनेल आणि त्याचा आनंद तम्हीही स्वत: उपभोगाल. तुम्ही साक्षात सत्य जाणले असल्यामुळे तुम्हाला इतर काहीच सांगण्याची जरुर पडणार नाही, आणि लोकांवर आपोआप तुमचा प्रभाव पडेल. तुम्ही भारत, अमेरिका, इंग्लंड असे कुठूनही आले असला तरी तुम्ही त्या आनंद, प्रेम व ज्ञानसागरात सामावले जाता. तुम्हाला खरा आनंद मिळाल्यावर तुम्ही आपोआपच तो आनंद पसरविण्यासाठी उत्सुक होता.

कधी कधी तुम्हाला लोक जागृती घेऊनही सहजयोगात येत नाहीत या बद्दल तुम्ही निराश होता. पण त्यामुळे तुम्ही निराश न होता हे कार्य करीतच राहिले पाहिजे. मी जेव्हा सहजयोग सुरु केला तेव्हा फक्त एका वृध्द महिलेला जागृती दिली आणि आता सहजयोग इतक्या मोठ्या प्रमाणावर पसरल्याचे तुम्ही पाहत आहात. त्यासाठी तुम्हाला विशेष अशी काही मेहनत किंवा पद्त



करण्याची जरुरी नाही. कारण हे सहजच घटित होत असते. तुम्हा प्रत्येकाला हजारो लोकांपर्यंत हा प्रकाश पोहचविण्याची शक्ती प्राप्त झाली पण अजूनही खूप मोठ्या संख्येने लोक अंधारातच आहेत. आणि त्यांना शोधून काढून त्यांना हा प्रकाश देण्याचे कार्य तुम्हाला करावयाचे आहे. परमचैतन्याच्या कार्यासाठी हे फार आवश्यक आहे.

सहजयोगातही काही लोक त्यांच्या वैयक्तिक प्रश्नांमुळे बेजार असतात. आणि भूतकाळाच्या समस्यांमध्येच गुंतून रहातात. पण तुम्ही आता तो सर्व भुतकाळ विसरुन जाऊन वर्तमानातच रहावयाचे आहे. आणि या परमकार्याचा विचार केला पाहिजे. एकदा प्रकाशात आल्यावर अंधार आपोआपच नाहीसा होतो. आणि तुम्हाला या कार्याची अधिक अधिक अधिक प्रेरणा मिळत जाते. म्हणून आत्मसाक्षात्कारामध्ये स्वत: प्रगल्भ होण्याचा ध्यास घेतला पाहिजे. तसे झालात की कार्य कसे सहज घडून येते याचे तुम्हाला आश्चर्य वाटेल. अंधार आपोआपच नाहिसा होतो. सहजयोगात प्रस्थापित झाल्यावर तुमच्या सर्व चूकीच्या समजूती गळून जातात. जे योग्य आहे तेच तुम्ही करता.

या अमेरिकेतील लोक सर्व बाबतीत पैशाचा विचार करतात. तसेच त्यांचे सर्व पैशाच्या दृष्टीकोनातून चालते. त्याचाच प्रभाव जगात इतरत्रही आता पसरु लागला आहे. म्हणून सहजयोगातही काही लोक पैसा मिळविण्याचा प्रयत्न करत असतात. तुम्हाला सहजयोगी म्हणून पैशाची काही काळजी करण्याची जरुरी नाही किंवा त्याबाबतीत काही असुरक्षित वाटण्याची आवश्यकता नाही. तुमची सुरक्षितता आतूनच सांभाळली जाते म्हणूनच भौतिक संमृध्दीच्या प्रभावाखाली राहण्याची तुम्हाला जरुरी नाही. हे परमचैतन्य तुमची सर्व प्रकारे काळजी घेते हे तुमचे तुम्हालाच लक्षात येईल. मला लोकांच्या समस्या सुटल्याची अनेक पत्रे येतात. पण खरे तर मी काहीच करीत नसते. तुम्ही प्रकाशात आल्यामुळेच तुमचा सर्व सांभाळ केला जातो. तसेच आत्मसाक्षात्कारी लोकही तुम्ही सहज ओळखू शकता, जाणू शकता. कधी कधी सहजयोग्यांनाही समोरची व्यक्ती ही आत्मसाक्षात्कारी आहे किंवा नाही हे ओळखता येत नाही. पण तुमच्याजवळ दुसरी व्यक्ती किंवा इतर गोष्टींची उपयुक्तता जाणण्याची शक्ती आहे. हे तुम्हाला परमचैतन्याचे फार मोठे आशीर्वाद आहेत. म्हणून परमचैतन्यावरच सदैव श्रध्दा बाळगून असा आणि तेच तुम्हाला सर्वप्रकारे योग्य मार्गावर ठेवत आहेत याची खात्री बाळगा. म्हणूनच तुम्ही सामुहिकते मध्ये इतके आनंदात व एकमेकांच्या प्रेमात समाधानी असता हे सर्व तुमच्यामध्ये आलेल्या प्रकाशामुळे घडून येत आहे. पण या प्रगतीसाठी ध्यान अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्येक दिवशी सहजयोग्याने ध्यान करणे आवश्यक आहे. जे लोक असे ध्यान करीत नाहीत ते कधी घसरतील ते सांगता येत नाही. ध्यान हे दिव्यातल्या तेला सारखे आहे म्हणून जे लोक ध्यान करीत नाहीत किंवा ध्यानाला महत्व देत नाहीत ते ही फार मोठी चूक करीत आहेत. सकाळ - संध्याकाळ ध्यान करण्याशिवाय पर्याय नाही. सहजयोगात सर्व काही सहजच घटित होत असल्याने ध्यानाचे महत्व लोक लक्षात घेत नाहीत. ध्यान न करणारा माणूस त्याच्या वागण्या, बोलण्यावरुन, स्वभावावरुन सहज लक्षात येतो. ध्यानामुळेच तुम्ही सदैव परमात्म्याबरोबर जोडलेले राहता. आणि तुमचे सर्व प्रश्न सुटतात. ध्यान केले नाही तर तुमच्यामधील प्रकाश क्षिण होत जातो. ध्यानामध्ये स्वत:बद्दलच्या आणि इतरांबद्दलच्या गोष्टी तुमच्या लक्षात येत राहतात. बरेच जण मला ध्यान कसे करावयाचे असे विचारतात.

खरे तर ध्यान म्हणजे 'काही करणे' असे नाही ध्यान म्हणजे सहज निर्विचारतेमध्ये राहणे. ही निर्विचार अवस्था तुम्ही मिळविली की सारे काही मिळविले. कारण त्याच स्थितीमध्येच फक्त तुम्ही सत्या बरोबर असता. म्हणून ध्यानामध्ये काय-कसे करावे याचा विचार करण्यापेक्षा आतून पूर्णपणे शांत होण्याकडे लक्ष द्या. ध्यान करणारे व न करणारे लोक मला लगेच लक्षात येतात. ध्यान न करणारे लोक नेहमी अस्वस्थ, गोंधळलेले असतात. ध्यान केले तरच परमात्म्याची सर्व शक्ती तुम्हाला उपलब्ध होत असते. त्यातुन तुमच्यामधील सर्व असुरक्षितपणाची भावना आणि इतर काळज्या दूर होतात. व त्या बरोबरच तुमच्या आतमधील अयोग्य व निराशजनक विचार येत नाही मगच तुम्हाला तुम्ही आतुन व बाहेरुन किती कार्यक्षम आहात ते जाणवते.

नियमीत ध्यान न करणारे लोक सहजयोगात फार पुढे जाऊ शकत नाहीत. म्हणून ध्यानामध्ये सदैव स्वत:च्या निर्विचारतेकडे लक्षपूर्वक व जाणिवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. म्हणजेच तुम्हाला परमचैतन्याबद्दल पूर्ण आत्मविश्वास प्राप्त होईल. धरमशाळेमध्ये ही काही मुले इतकी आत्मविश्वास असणारी व नम्र पाहिल्यावर मलाच फार आश्चर्य वाटते. जितके ध्यान कराल तितका परमात्म्याबरोबरचा तुमचा संबंध अधिक - अधिक दृढ होत जातो. ध्यानामधे प्रगल्भ झालेले लोक मला ताबडतोब ओळखता येतात. ही प्रगल्भता निर्विचारते मधूनच प्राप्त होणारी आहे. निर्विचार स्थितीमध्ये तुम्ही कुठल्याही व्यक्तीकडे किंवा घटनेकडे पाहता तेव्हा तुमचे मन चिंतनशील बनते. त्या स्थितीमध्ये तुम्ही लोक किती वेळ राहू शकता हे मला माहित नाही. पण एक क्षणभर जरी ती अवस्था तुम्ही मिळविली तरी क्षणा- क्षणाने



ती वाढत जाणार आहे. इथल्या एवढया मेणबत्त्या पाहिल्या की मला त्या जणू ध्यानच करीत आहेत असे वाटते.ध्यान न केल्यामुळेच आणि परमात्म्याशी सतत संपर्कात न राहिल्यामुळेच तुमच्यात अनेक प्रश्न निर्माण होतात. म्हणून निर्विचारता आल्यावर परमचैतन्य कार्यान्वीत होते आणि तुम्हाला सर्व प्रकारची मदत करते. म्हणून ध्यानामधून निर्विचार अवस्था मिळविण्याचे महत्व निट समजावून घ्या. विचार थांबले की तुम्ही डावी-उजवीकडे किंवा भुत-भविष्याकडे अजिबात आडकत नाहित आणि फक्त वर्तमानातच राहता. ही स्थिती मिळविण्याचा तुम्ही अधिक अधिक प्रयत्न केला पाहिजे आणि त्यामध्ये प्रस्थापित झाले पाहिजे. मग ती अवस्था किती काळ टिकते याची काळजी करु नका कारण ती आपोआपच वाढत जाणार आहे. या स्थितीबद्दल अनेक ग्रंथांमधून आणि विद्वान पुरुषांनी चर्चा केली आहे. तरीही मी मुद्दाम हे सोपे करुन तुम्हाला सांगत आहे. ही अवस्था मिळवायला तुम्हाला वेळ लागला तरी तुम्ही कुचकामी आहात असे स्वत:ला समजू नका. सातत्याने प्रयत्न करीत राहिल्यास तुम्हाला ती खात्रीने प्राप्त होणार आहे.

निर्विचारतेमधून मनाला चिंतनशील स्थिती आली की तुमच्या समोरच्या व्यक्तीच्या किंवा गोष्टीच्या अंतरंगात तुम्ही उतरता. प्रसंगी माझे तुम्हाला आग्रहाचे सांगणे आहे की ही निर्विचारता स्थिती मिळविण्याचे तुम्ही सातत्याने प्रयत्न करा. त्यातुनच तुमची आधिक आधिक चांगली प्रगती होणार आहे.तुमच्यामधे अनेक जणांनी याबाबतीत चांगली प्रगती साधली आहे. तरीही अधिक आधिक सहजयोग्यांनी त्या स्थितीमध्ये प्रगल्भ होण्याचा प्रयत्न करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

आज दिवाळीचा शुभ मुहुर्त आहे. आणि आपण सगळीकडे दिवे लावून ती साजरी करतो. त्याप्रकारे तुमच्यामधिल प्रकाश अधिक-अधिक तेजस्वी होण्यासाठी ध्यानामध्ये निर्वीचारतेकडे लक्ष द्या. आनंदाचा हा सागर तुमच्यामधेच अंगभुत आहे. त्या शिवाय तुम्हाला खऱ्या आनंदाचा अनुभव येणार नाही. मग तुम्हीच त्या आनंद स्तोताचा एक अंश झाल्याचे पाहून तुम्ही आश्चर्य चकित व्हाल. म्हणूनच आजच्या या दिवाळीच्या प्रसंगी निर्वीचार ध्यान अवस्था मिळवा असा माझा संदेश आहे. कसलाही विचार तुम्ही स्वत:मधूनच निर्माण केलेला असतो. म्हणून कसल्याही विचाराला काहीही महत्व नाही. परमात्म्या बरोबर संधान मिळविणासाठी कमीतकमी आवश्यक गोष्ट म्हणजे ध्यानामधिल निर्वीचार अवस्था. मगच तुम्ही सहजयोगात अधिक - अधिक प्रगल्भ होत असल्याचे तुम्हा स्वत:ला जाणवेल.

सर्वांना अनेक आशीर्वाद

जैसी बुध्दी हृदय है इनके, तैसीयै मुख बात कही री ।

रवि को तेज उलुक न जाने, तरनि सदा पूरन नभही री ।

विष को कीट विषहि रुचि माने, कहा सुधा रसही री ।

सूरदास तिल-तेल-सवादी स्वाद कहा जाने घृतही री ॥

त्याची बुध्दी आणि हृदय जसं कलुषित होतं, तसं ते बोलले. सूर्याचे तेज ढोलीत बसलेल्या घुबडाला जसं कळत नाही, त्याकरता गगनात स्वच्छंद विहार करणारे पक्षीच हवेत, त्यांनाच त्याचा आनंद होतो. म्हणूनच पहाटेच्या सूर्योदयाबरोबर त्यांची आनंदाने किलबिल सुरु होते. विषातच राहणाऱ्या कीटकांना अमृत-रसाचा आस्वाद कसा आवडणार? सूरदास म्हणतात, ज्यांना जन्मभर तिळाच्या तेलातल्या मिठाईशिवाय दुसरं काही मिळालं नाही, त्या दरिद्रयांना तुपातल्या मिठाईचा स्वाद काय समजणार ?

(जे जन्मभर भौतिक सुख मिळविण्याच्या मागे लागले त्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन घेतल्यानंतरच्या सहस्त्रारावरील "चैतन्य लहरींचा" आनंद काय समजणार ?)





# वाणीचे प्रकार व मंत्र

नवरात्री पूजा १९८८ प्रतिष्ठान पुणे (सारांश)

ज्या शक्तिने आपण बोलतो ती 'वैखरी'.

कोणत्याही देवाचे नाव घ्या, विचारा, तुम्ही आहात का?(चैतन्य लहरी..)कारण, या सर्वाचे सत्व ऐशलिश शक्ति आहे. तुम्हाला चैतन्य मिळाले आहे, कारण मी ती शक्ति आहे. कोणाचेही नाव घ्या संत, ऋषी, महर्षी, ते सर्व मी आहे. त्यांना हे सांगायचे आहे

-बीज मंत्र म्हणजे वैखरी, वैखरी ही बोलण्याची शक्ति आहे. साक्षात्कारी लोकांनी या बोलण्याच्या शक्तिपासून मंत्र बनविले आहेत. म्हणून आता सुधारणा करण्यासाठी, म्हणजे ज्यांनी आपल्या चक्रांची, डाव्या, उजव्या बाजूची सुधारणा करावयाचे असेल तर त्यांनी बीज मंत्र म्हणायचे. बीज मंत्र म्हटल्यास, त्या भागात, बीज जाते, मग बीज अंकुरित होते, व वृध्दिंगत होते. तेव्हा पहिली पायरी म्हणजे बीज मंत्र म्हणायचा मग, वेगळ्या चक्रांच्यासाठी वेगळे बीज मंत्र म्हणायचे. एक बीज आहे, व मग वृक्ष तेव्हा सर्वात प्रथम तुम्हाला बीज माहिती असेल, तर त्याचे उच्चारण करुन तुमच्यामध्ये बीजारोपण करायचे व नंतर बाकी सर्व म्हणायचे. अशा तऱ्हेने ते बीज वाढेल असे करायचे.

संस्कृत शब्द कुंडलिनीच्या हालचालीमधून आले आहेत. त्यावेळी नाद निर्माण होतात. महान संतानी हे सर्व रेकॉर्ड करुन ठेवले आहे. अशा पध्दतीने, प्रत्येक चक्राचे त्यांच्या पाकळ्यांच्या संख्येप्रमाणे व्यंजने व स्वर आहेत. त्यांच्यापासून संस्कृत वर्णमाला तयार झाल्या आहेत.म्हणून संस्कृत पवित्र आहे.

हीच भाषा पवित्र केली गेली. प्रथम एकच भाषा होती, त्या भाषेमधून दोन भाषा निर्माण झाल्या, एक लॅटिन व दुसरी संस्कृत, संस्कृत भाषा संतांच्या कडून आली. त्यांनी सर्व ऐकून ही घडविली आणि ती ''वैखरी'' शक्ती आहे. आता ''वैखरी, शक्ती आहे व लिपी आहे. शक्ती आहे आणि वाहक इन्स्ट्रुमेंट आहे. पण ते दैवी पध्दतीने कार्यान्वित करण्यासाठी तुम्हाला त्याचे रुपांतर मंत्राच्या मध्ये करावे लागते. कोणताही मंत्र तयार करण्यापूर्वी तुम्हाला बीज मंत्र ज्ञात असणे आवश्यक आहे. समजा तुम्हाला स्वत:ची कुंडलिनी चढवायची असेल, बीज मंत्र आहे 'ऱ्हींम' आणि या 'ऱ्हीम' पासून मंत्र बनवायचा 'ओम त्वमेव साक्षात श्री ऱ्हीम' त्यानंतर सर्व देवतांचे मंत्र म्हणायचे.

- आता तुम्ही सर्व विदवान झाला आहात. आता ही विद्या हळू हळू तुमच्यामध्ये कशी गेली ते तुम्ही समजून घेण्याचा प्रयत्न करा.कोणी शिक्षक हातात छडी घेऊन बसला नव्हता. सर्व विद्या आतून व बाहेरुन प्रकट झाली. मी जे काही सांगते ते तुम्ही चैतन्य लहरीवर पडताळता म्हणूनच त्या जातात. मी सांगते म्हणून तुम्ही त्याचा स्वीकार करता असे नाही तर ते वास्तविक आहे. समजा मी म्हणाले '' हे पाणी आहे'' मग काय तुम्ही पाणी प्याल व त्यामुळे तुमची तहान भागते कि नाही ते पहाल. तेव्हाच ते पाणी आहे यावर तुम्ही विश्वास ठेवाल अन्यथा विश्वास ठेवणार नाही. हे ही तसेच आहे.

- आपण स्वयं सिध्द आहोत.

- 'रा' म्हणजे शक्ति, 'धा' जी शक्ति धारण करते ती राधा, ती महालक्ष्मी आहे म्हणून ती कुंडलिनीला धारण करते;

- ही आदिमाता आहे आणि रा शक्ति म्हणजे कुंडलिनी. म्हणून 'ऱ्हि' याचा अर्थ महालक्ष्मी तत्वामधून म्हणजे 'र' मधून जाणारी शक्ति कुंडलिनी. म्हणून ऱ्हीम. योग्यांना केवळ समग्रता हवी असते. योग्यांना योग हवा असतो, म्हणून त्यांना शक्तिची आणि आदिमातेची काळजी घ्यायला हवी. हे अतिशय महत्त्वाचे आहे कारण कुंडलिनी शक्ति व आदिमाता असायला हवी. चौदा हजार वर्षापूर्वी त्यांनी हे सर्व लिहिले आहे व ते सर्व सत्य आहे आणि आता तुम्ही ते जाणता. आता तुम्ही सप्तशती वाचाल तेव्हा तुम्हाला ते समजेल.

-सत्‌रुपिणी- महालक्ष्मी, चित्त स्वरुपिणी - महासरस्वती,

" ब्रम्हज्ञानासाठी आम्ही आपले ध्यान करतो" त्याचे शिवाय तुम्हाला मिळाले आहे, ध्यानाशिवाय तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. म्हणून ध्यान करायलाच हवे.

साक्षीस्वरूपात तुम्ही शून्य होता. तुमचे मी पण साक्षीस्वरूपात नसते. तुम्ही पहाता आणि शून्य स्थिती असते. जेव्हा शून्य स्थितीत असता, तेव्हा 'ती' असते. ही 'ती' शक्ति कोणती. तुम्ही निर्विचार असता, हजारो लोकांना निर्विचारता मिळाली आहे. तुमची कुंडलिनी चढली तर ते मला समजते. तुम्हाला समजले नाही तरी मी सांगते की झाले, त्यामुळे तुम्हाला कळते. तेव्हा तुमच्या सर्व अवस्था तिला कळतात तेव्हा सर्व कल्पना एखाद्या कॅाम्प्युटर सारखी येते. ते इतके व्यवस्थित तयार केले आहे की सर्व रेकॉर्ड होते, काय घडते आहे वगैरे. मी बोलत असते आणि एखादा माणूस मध्ये बसलेला असतो, मी म्हणते 'हे' म्हणजे चित्त तिकडे सुध्दा आहे आणि लगेच कुंडलिनी चढते. तर ते असे आहे.

महालक्ष्मी मेंदूची काळजी घेते. मेंदूच्या द्वारे तुम्हाला सर्व ज्ञान मिळते व या मेंदूचे पालनपोषण, महालक्ष्मी शक्ति करते.

"परा वाणीचा" उगम येथून होतो (श्री माताजी आपला हात नाभीवर ठेवतात.)

"परावाणी" हा नाद आहे व तो शांत आहे. नंतर तो हृदयात येतो आणि तेथे त्याला अनाहत नाद असे म्हणतात. पुढे ती पश्यांती वाणी होते, पश्यांती, म्हणजे साक्षीस्वरूप.

ती वाणी- शक्ति, ती नाद- शक्ति, अनाहत स्थिती मध्ये असताना, साक्षीस्वरूप असते. त्यानंतर ती ते विशुध्दीच्या स्तरावर येते, अद्याप ती मधल्या कंठाच्या, स्थानापर्यंत तिला 'मध्यमा' म्हणतात. मुखात आल्यावर ती 'वैखरी' होते, म्हणजे देवाला काही बोलायचे असल्यास तो परावणीत बोलतो, तुम्हाला ते ऐकता येत नाही. देव काय सांगतो, ते तुम्हाला ऐकू येत नाही. तसेच तुमच्यामध्ये तुमची परावणी आहे. ती अर्थातच मानली आहे, परावाणीचे प्रतिबिंब आहे. ते तुम्हाला ऐकू येत नाही, त्यामुळे काय होते? स्वत:च पृथ्वीवर यावे लागते. आणि सर्व समजावून सांगण्यासाठी त्याच्या वैखरी वाणीचा उपयोग करावा लागतो मग त्याच्यामुळे तुम्ही खाली-खाली जाऊ लागता. तेव्हा तुम्ही मध्यमा स्थिती मध्ये येता, त्या ठिकाणी तुमच्या मधील शांतीचा आनंद तुम्ही घेता. नंतर तुम्ही पश्यांती मध्ये येता. तुमच्या मधील साक्षी स्वरूपतेचा आनंद तुम्ही अनुभवता. पुढे तुम्ही परा वाणीमध्ये येता त्या ठिकाणी तुम्हाला नाद किंवा असे म्हणता येईल की माहिती मिळते, केवळ माहिती, आवाज नाही, गोंधळ नाही फक्त विचारासारखी माहिती मिळते. केवळ माहिती, विचारांना आवाज नसतो. म्हणून प्रेरणा, परा वाणी पासून मिळते पण त्याचा नाद, आवाज नसतो अशा तऱ्हेने कोणत्याही नादा शिवाय हे घडून येते. एका सहजयोग्याने विचारले " ही परवाणी भवसागरात आहे की नाभीत, की एखाद्या विशिष्ट स्थानी?" श्रीमाताजी म्हणाल्या नाभीत लक्ष्मीतत्व आहे. महालक्ष्मी तत्वाला सुरुवात झाल्यावर वरील सर्व घडून येते. परंतु तुम्ही अधिक उच्च स्थितीला जाता. आज्ञा मध्ये येता तेव्हा ही वाणी अनहत होऊन जाते. अनाहत याचा अर्थ चैतन्य लहरीचा आवाज मी ऐकू शकते. म्हणजे माझ्यावर कोणी हात धरल्यास त्यालाही ऐकू येईल. सर्व प्रकारचे आवाज तुम्हाला ऐकू येतात.त्यानंतर ती मस्तकांत येते. सहस्त्रारांत आल्यावर ती स्पंदन निर्माण करते आणि ब्रम्हरंद्र उघडते. मग वाणी नाद बनून परमेश्वराशी एकरुप होते. या अवस्थेपर्यंत ती येते. हा परमेश्वराचा आलेला भाग आहे. पण तो दिला जातो तेव्हा, आज्ञा चक्र उघडते व जेव्हा सहस्त्रार उघडते तेव्हा ही वाणी, हा चैतन्य लहरीचा नाद, पण बाहेर येतो. मुख्य गोष्ट ही आहे, की समजून घ्यायला हवे. जेव्हा तुम्ही निर्विकल्प स्थितीला पोहोचता त्यावेळी, या वाणीच्या माध्यमातून तुमच्या मेंदूमध्ये प्रेरणा येते व हीच तुम्हाला ऐकू येत नाही. तसेच तुमच्यामध्ये तुमची परावाणी आहे. ती अर्थातच मानली आहे, परावाणीचे प्रतिबिंब आहे. ते तुम्हाला ऐकू येत नाही.

हा परमेश्वराचा आलेला भाग आहे. तो दिला जातो तेव्हा, आज्ञा चक्र उघडते व जेव्हा सहस्त्रार उघडते तेव्हा ही वाणी, हा चैतन्य लहरीचा नाद, पण बाहेर येतो. मुख्य गोष्ट ही आहे, की समजून घ्यायला हवी, जेव्हा तुम्ही निर्विकल्प स्थितीला पोहोचता त्यावेळी, या वाणीच्या माध्यमातून तुमच्या मेंदूमध्ये प्रेरणा येते व हीच वाणी तुमच्या मेंदूमध्ये प्रेरणा देत व तीच प्रेरणा तुम्हाला समजून घेण्याची तिच क्षमता देते. जसे मी तुम्हाला सांगते की तुम्ही गर्भित अर्थ लक्षात घ्या कारण तुम्ही आता सूक्ष्म व संवेदनाशील झाला आहात. म्हणून तुम्ही सूक्ष्मातील समजू शकता आणि सूक्ष्म गोष्टी सांगू शकता जसे काही लोक कवी झाले आहेत.

एका सहजयोग्याने प्रश्न विचारल्यावरून श्री माताजी म्हणाल्या "सुरुवातीस सदाशिव आणि आदिशक्ति अलग झाल्यावर, टणत्कार निर्माण झाला.तो टणत्कार मंगलमय आणि पवित्र होता आणि सर्व वातावरणात पसरला. ती मुख्य सर्व गोष्टीची सुरुवात होती. मग आदिशक्तीने तीन रुपे विभक्त होऊन धारण केली. एका रुपाने पंचमहाभूताची सुरवात केली. त्याच्यापासून सर्व सष्टीची निर्मिती झाली.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद

# विशुध्दी चक्र

- कलीयुग सत्य युगाच्या नव्या पर्वात जात आहे, पण त्या दोघामध्ये कृतयुग आहे. तिथे सर्वत्र संचार करणारी ही देवाची प्रेमशक्ती कार्य करणार आहे. कृष्ण हे मुत्सद्दीपणाचे अवतरण होत. त्यामुळे इकडे तिकडे फिरवून असत्य व खोटेपणा ते पुढे आणतात आणि तसे करताना लोकांची पारख करतात. हा शेवटचा निवाडा असल्याने श्रीकृष्णाच्या मुत्सद्दीपणांच्या शक्तीचे यावेळी प्रकटीकरण होणं हे फार महत्वाचे आहे. अनभिज्ञतेमुळे किंवा मुद्दाम जी काही कार्ये कशी केलीत त्याची परतफेड होईल व पूर्वायुष्यामध्ये तुम्ही केलेल्या पुण्याबद्दलही मोबदला मिळेल. हे सर्व श्रीकृष्णाच्या सामुहिकतेमधून केले जाते. सामुहिकतेने ते सर्व परिस्थितीचे अवलोकन करतात.

- आज आपण योगेश्वरांचा म्हणजेच श्रीकृष्णांचा सन्मान करत आहोत. तो खातो आणि काहीच खात नाही. झोपतो पण झोपत नाही, त्याला अनेक पतन्या आहेत पण त्या पतन्या नाहीत असा हा योगेश्वर आहे. म्हणून तुम्ही त्याच्यासारखे बनलं पाहिजे. तुमची बुध्दी त्याच्या आशीर्वादाने प्रकाशित होऊ दे आणि तुमचं व्यक्तिमत्व इतकं महान होऊ दे की तुमच्यात सर्व काही सामावून येईल, तुम्ही सर्व काही पाहू शकाल, योग्य काय अयोग्य काय हे समजण्याचं तारतम्य तुम्ही मिळवाल.श्रीकृष्ण, कुबेर आहेतच त्यांच्या पायाशी लक्ष्मी लोळत आहे. त्यांनीच तुम्हाला सर्व वैभव दिले, त्याचे पूरेपूर आशीर्वाद तुमच्याजवळ आहेत म्हणून तुमच्याजवळ पैसा बुध्दी सर्वकाही आहे. कोणती गोष्ट कमी असेल ती सूज्ञता. जसं तुमच्याजवळ गाडी आहे किल्ल्यापण आहेत पण तुम्हांला गाडी चालवता येत नसेल तर कसे होईल?

- जसं महंमदसाहेबांनी म्हटले आहे, तुमचे हात बोलतील आणि तुमच्या विरुध्द ते साक्ष देतील. तुमच्या हातावर तुम्हांला कळेल, आता हे हात श्रीकृष्णांचे आशीर्वाद आहेत. विशुध्दीमधून ते येतात(संबंधित) श्री आणि ललित चक्र असतात. या हातांनी आपल्याला चैतन्य(व्हायब्रेशन)जाणवते.उजव्या विशुध्दीमुळे तुम्हाला हे जाणवणार नाही. त्याचा अर्थ तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला नाही असा नव्हे. तुम्हाला मिळाला आहे, फक्त तुमचे हात कार्यान्वित करा.

- म्हणून आपण आपले विशुध्दी चक्र स्वच्छ ठेवावे. विशुध्दी चक्र म्हणजे विराट होय.कृष्ण विराट स्वरुप आहे. शेवटी कृष्ण विराट होतात. सर्व उत्क्रांती विष्णुशक्तीतून होते व मग विष्णूच विराट होतात. विशुध्दी चक्र ठीक रहावे म्हणून आपले मस्तक कोणापुढे झुकवू नये. ते फक्त विराटापुढेच झुकवावे कारण तुम्हीच विराटाचे अंगप्रत्यंग आहात. तुम्ही कोणापूढे मान झुकवली तर विराटालाच तुम्ही विसरता. महम्मदांनी विराटाचा मोठा मंत्र सांगितला.-अल्ला हो अकबर- अकबर म्हणजे विराट. परमेश्वर विराट आहेत या मंत्राच्या उच्चाराने आपले विशुध्दी चक्र खुलते.

- श्रीकृष्णांच्या अवताराचे सार हे की ते योगेश्वर होते. त्यांच्या योगामध्ये पूर्णपणे अलिप्तपणा वस्तुस्थितीसाठी त्यांना पाच पतन्या होत्या आणि १६००० स्त्रिया, ज्या त्यांच्या पतन्या बनल्या. त्या दुसऱ्या काही नसून १६००० शक्त्या होत्या. विशुध्दी चक्राच्या १६ पाकळ्या गुणिले विराटाच्या १००० पाकळ्या मिळून १६००० शक्ती होतात. या शक्त्यांनी स्त्रिया म्हणून अवतार घेतला आणि भयंकर अशा राजाने त्यांना पळवले. श्रीकृष्णांनी त्याचा पराभव करुन त्यांची सुटका केली आणि लग्न करुन संरक्षण दिले.

- श्रीकृष्णांची(उजवीकडील)शक्ती, मूलतत्व गोडवा, त्यांची शक्ती राधा- रा-उर्जा व धा- जी उर्जा धारण करणे आणि त्यांची शक्ती म्हणजे आल्हाद आनंद देणारा गुण. श्रीकृष्णाचा गुण म्हणजे ते योगेश्वर होते, अक्षेय साक्षी. नेहमी किंचाळणारी, जोराने खेकसणारी, स्वत:चे भान सोडून वागणाऱ्या व्यक्तीला उजव्या विशुध्दीचा त्रास होतो.एखाद्याला रागवण्याऐवजी गोडीने सांगितले पाहिजे. सर्वात उत्तम म्हणजे शांतता राखून- मौनाने उजव्या विशुध्दीला आराम देणे.

■ डावी विशुध्दी विष्णूमाया आहे. एकदा कांती पकडली की तुम्हांला विष्णूमायेचे सर्व प्रश्न उद्‌भवतात. त्यापैकी एक आहे हृदय, विष्णूमाया विजेसारखी आहे. विष्णूमायेचा प्रश्न असला की तुम्ही आळशी बनता, मी किती दोषी आहे. तुम्ही निराश होता. ते विष्णूमाया तत्त्व तुमच्यामधून अदृष्य होतं. ताबडतोब येणारी जलद अशी तीच शक्ती आहे. सर्व जगाला श्रीकृष्ण काय आहे ते तीच सांगते. ज्या सहजयोग्यांना दोषी वाटते ते म्हणतात की आम्ही जर काही काम केले तर आमचा अहंकार वर येईल, म्हणून आम्हांला करायचं नाही, हे मूर्खपणाचे आहे. तुम्ही जर मेणबत्ती पेटवली आणि ती म्हणेल मला प्रकाश द्यावयाचा च नाही. याप्रकाशाने कदाचित माझा अहंकार वाढेल, हे मूर्खपणाचे आहे. या डाव्या विशुध्दीबाहेर पडायच म्हणजे सहजयोगात अतिशय प्रभावी बनायचं.

■ विशुध्दी हे महत्वाचे चक्र आहे डावी विशुध्दी हे चक्र पकडले तर तुम्हाला अंजायना, स्पॉन्डीलिसीस व शिथिल इंद्रिये हे रोग जडतात. डावी विशुध्दी पाश्चात्यांच्या बाबतीत एक फॅशन झाली कारण ख्रिस्ती धर्मात आपण कबूल करतो की मी पापी आहे, नव्हे जन्मत:च पापी आहे. तुम्ही स्वत:ला दोषी म्हणवून घेवू लागता आणि या दोषांच्या भावनेने तुमची डावी विशुध्दी धरते. ही दोषी वृत्ती वाढली की स्वत:ला ठीक न करता -मी अपराधी-ही जाणीव वाढून जीवनातील सूक्ष्मता निघून जाते. तिचा मध्यवर्ती नससंस्थेशी संबंध असल्यामुळे तुम्हाला हातावर चैतन्य जाणवत नाही ती नस चेपली जाते. त्यामुळे डावीकडे काहीच जाणवत नाही.

■ भाऊ म्हणून श्रीकृष्णाने द्रौपदीचा सांभाळ केला म्हणून भारतात भाऊबहिणीच्या नात्याला फार महत्व आहे. सहजयोगातसुध्दा त्यासाठी रक्षाबंधन व भाऊबीज करतात. रक्षाबंधनात आम्ही भावांना राखी बांधतो ही राखी म्हणजे विष्णुमायाशक्तीने भावांचे रक्षण करणे तर भाऊबहिणीचे हे नाते म्हणजे जाणीवेचे स्मवयस्कतेचे रक्षणात्मक, शुध्द प्रेमाचेच द्योतक आहे. हेच विष्णूमायेचे कार्य आहे.

■ जेव्हां आपण विराटाकडे येतो त्याआधी आपल्याला हंस चक्र ओलांडावे लागते. त्याशिवाय आपण विराटाकडे पोहोचत नाही.हंस म्हणजे दैवी सारासार, विवेकबुध्दी. ती आपल्यामध्ये हवीच. एकदा कां तुम्ही ती विकसीत केली की तुम्ही कधीच चूका करणार नाही. बऱ्याच सहजयोगी मंडळीमध्ये डाव्या विशुध्दीबरोबरही विवेक आला आहे. त्यामुळे पहिली गोष्ट म्हणजे लोक तुमच्यामुळे प्रभावित होतात, ती खरी सामुहिकता आहे. हा फार महत्वाचा मुद्दा तुम्हाला माहित हवा.

■ श्रीकृष्णांनी त्यांची बुध्दी चलाख असल्यामुळे अर्जुनाला जादू केल्यासारखे समजावले की तु कर्म करतोस आणि स्थितप्रज्ञपण आहेस तेव्हां कर्माची फळे ईश्वराच्या चरणी अर्पण कर. सर्व धर्म सोडून दे आणि मला शरण ये. आता धर्म म्हणजे काय? अडचण ही की लोक कृष्णाला समजू शकत नाही. हे सर्व ज्ञान श्रीकृष्णामध्ये आणि त्यांच्या अवतार कार्यामध्ये सामावलेलं आहे. म्हणून ते म्हणतात कर्म करत रहा, पण ती सर्व ईश्वरचरणी समर्पण करा.स्थितप्रज्ञता मिळाल्याशिवाय हे होणे शक्य नाही, आत्मसाक्षात्काराशिवाय हे होणार नाही. तुम्ही जेव्हा जागृती देता तेव्हा मी देत आहे असे न मानता हे घटीत होत आहे असं म्हणता, म्हणजे हा -मी-नाहीसा झाला की मगच सर्व ईश्वरार्पण करु शकाल. प्रथम हाच धर्म झाला पाहिजे.

■ आपली विशुध्दी स्वच्छ ठेवणे हे महत्वाचे समजले पाहिजे. सर्वप्रथम आपल्यामध्ये सुरेख व स्वच्छ हृदय पाहिजे. ज्यामध्ये श्रीकृष्णाच्या मधुर संगीताचा सुगंध आहे. विराटाकडे पहा तुमचे काय चुकते ते पहा आणि ठीक करा कारण दुसरे कोणी ते ठीक करु शकणार नाही. तुमची विशुध्दी चांगली असेल तरच तुम्ही ते करु शकाल, नाहीतर तुम्ही स्वत:ला पाहू शकणार नाही. कारण फक्त विशुध्दीच्या बिंदूवरच तुम्ही साक्षी होऊ शकता. त्या स्थितीत तुमचे काय चुकते ते तुमच्या विशुद्धीत पाहू शकता. शेवटी श्रीकृष्ण हेच मेंदू बनतात. पोटातील चरबी मेंदूमध्ये जाते. त्यामुळे श्रीनारायण मेंदूमधे शिरतात आणि विराट बनतात. अकबर जेव्हा ते अकबर बनतात तेव्हां ते जडसृष्टीतील मेंदू बनतात. श्रीकृष्णाच्या पूजनाने अहंकार विरहित बुध्दीमत्ता ज्याला मी शुध्द बुध्दीमत्ता म्हणते ती प्रकट होऊ लागते.



# संगीत प्रोग्राम प्रतिष्ठान पुणे वृतांत

दिनांक २२ फेब्रुवारी ०३

शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी कुमारी अनुपमा च्या वाढदिवसानिमीत्त प्रतिष्ठानवर पुणे सहजयोग केंद्राने विशेष कार्यक्रम आयोजीत केला होता. प्रतिष्ठान मधील हॉलमध्ये कार्यक्रम संध्याकाळी सात वाजता सुरु होणार होता. स्टेजवर फुलांची आकर्षक सजावट केली होती. वातावरण अत्यंत आनंदी होते.कार्यक्रमासाठी श्रीमाताजींचे काही गेस्ट उपस्थित होते.

प.पू.श्रीमाताजींचे मुख्य हॉलमध्ये रात्री ८.३० च्या सुमारास आगमन झाले. त्यावेळी त्यांच्या सोबत सर सी.पी.श्रीवास्तव साहेब तसेच कल्पनादीदी व कुमारी अनुपमा होत्या. सुरवातीला प.पू.श्रीमाताजींना श्री राजेंद्र पुगालिया यांनी हार अर्पण करुन स्वागत केले. तसेच श्रीवास्तव साहेबांचा हैद्रावादचे लिडर श्री मोहनराव यांनी हार घालून सत्कार केला तसेच कल्पनादीदी व अनुपमाचा मिसेस मोहनराव यांनी सत्कार केला नंतर कार्यक्रमाची सुरवात झाली. सुरवातीला विश्व निर्मल धर्म शाळेच्या लहान मुलांनी गणेशवंदना सादर करताना प्रत्यक्ष गणेशांचा मुखवटा घातलेल्या मुलासमोर दोन लहान मुलींनी 'सारेगमप.मपधनीसा मंगलमुर्ती मोरया' या प्रसिध्द गाण्याच्या कॅसेटवरा नृत्य सादर केले. त्यानंतर दहा लहान मुलांनी मिलीटरी पेहरावात 'नन्हा मुन्हा राही हूँ देश का सिपाही हूँ बोलो मेरे संग जय हिंद जय हिंद जय हिंद' या कॅसेटवर आकर्षक कवायत नृत्य सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली.

त्यानंतर पुणे सेंटरच्या वतीने कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यातील ी पुणे सेंटरचे सौ चौकुलकर यांनी बसविलेली सर्व गाणी श्री बागडदे व सहकार्यांनी म्हटली. सुरवातीला 'मेरे घर आयी एक नन्ही परी' या गाण्यावर दोन मोठया मुलींनी पाढऱ्या परीच्या वेशात नृत्य केले आणि वाढदिवस समारंभाच्या वातावरणाची निर्मीती केली. नंतर 'बार बार दिन ये आये बार बार दिल ये गाये तुम जीयो हजारो साल ये मेरी है आरजू' या गाण्यावर आठ लहान मुलींनी परीच्या वेशात नृत्य केले. त्यानंतर 'सारे के सारे गामा को लेकर गाते चले' या गाण्यावर सात मुलांनी हातात फुले घेऊन डान्स केला. 'हम भी अगर बच्चे होते नाम हमारा होता बबलू' या गाण्यावर दोन मुलांनी विदुषकाच्या पेहरावात सोबत चार लहान मुलांसोबत डान्स केला. लहान मुलांनी फुगे हातात घेऊन 'तुम जीयो हजारो साल साल का दिन हो पचास हजार' या गाण्यावर डान्स केला. शेवटी सर्व मुलांनी स्टेजवर एकत्र येऊन श्रीमाताजींचे आर्शीवाद घेतले त्यावेळी 'श्रीमाताजी वंदू तव चरणा निर्मल है विष्व आपुले' हे गाणे म्हटले.

त्यानंतर कुमारी अनुपमाचे स्टेजवर केक कापण्यासाठी आगमन झाले त्यावेळी सोबत कल्पनादीदी स्टेजवर आल्या. अत्यंत चैतयमय वातावरणात श्रीमाताजींच्या सहवासात प्रचंड टाळ्यांच्या गजरात केक कापण्यात आला. नंतर कार्यक्रमाचा दुसरा भाग म्हणजे पुणे म्युझिक गृपचे श्रीबागडदे आणि सह्कारी यांचे स्टेजवर आगमन झाले त्यांनी सुरवातीला दहा गुरुंचे वर्णन असलेली कव्वाली 'नानक,मोहंम्मद,इब्रहिम,मुसा' ही कव्वाली म्हटली. त्यानंतर मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या पत्नीने 'दरबार जहा लाखो है लेकिन तेरे दरबार जैसा कोई नही' ही कव्वाली सादर केली आणि सर्वांना आश्चर्यचकित केले. श्रीबागडदे आणि सहकाऱ्यांनी 'तुम्हे देखू ऐसी नजर मांगता हूँ' ही नवीन कव्वाली सादर केली. शेवटी देवीचा नान स्टॉप गोंधळ 'माझ्या निर्मल आईचा कसा सोहळा साजतो' सादर करुन सर्वांना नाचवले त्यावेळी रात्रीचे सुमारे १०.३० वाजले होते.

सर्वांचे डिनर झाल्यानंतर रात्री परत वातावरण निर्मीतीसाठी श्रीबागडदे यांनी 'जिक्र निर्मल तेरा पाको निर्मल है तु' या कव्वालीने उर्वरित कार्यक्रमाचा भाग सुरु झाला त्यावेळी रात्रीचे १२ वाजले होते. प.पू.श्रीमाताजींचे, श्रीवास्तवसाहेब व कल्पनादीदी सोबत अर्धा तासानंतर आगमन झाले. प्रसिध्द किराणा घराण्याची गायका श्रीमती मीना फातरपेकर यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला शंकरा रागात 'शंकर भंडार डोले' सादर केले, त्यानंतर 'निर्मल भजन विना सुख शांती नाही' हे अत्यंत भावनात्मक गीत हृदयातून गायल्या, 'देवा हो देवा बोला हो माझ्याशी' हे मराठी गीत गायल्या. शेवटी अग 'वैकुठीच्या राजा' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली त्यावेळी जवळ जवळ १.४५ वाजले होते. प.पू.श्रीमाताजींनी सर्वांना अनंत आशीर्वाद दिले आणि कार्यक्रम संपला.



# महाकवी संत सूरदास

महाकवी संत सूरदास हे आत्मसाक्षात्कारी कवी होते. ते सन १४७८ ते १५८२ या कालावधीत होऊन गेले. त्यांचा जन्म दिल्लीजवळच्या 'सोही' नावाच्या गावात एका अत्यंत दरिद्री सारस्वत ब्राम्हणाच्या कुटुंबात झाला. एका दंत कथेप्रमाणे ते जन्मत:च आंधळे होते; पण त्यांना पदरचना व संगीतात अप्रतिम प्रतिभा लाभली होती. पण दुसरी दंतकथा सांगते की, तरुण सूरदास अत्यंत देखणे होते व त्यांचे डोळे विलक्षण आकर्षक व मोहक होते. ब्राम्हण धर्माप्रमाणे ते ज्यावेळी स्व-रचित भजने गोड गळ्याने गात रस्त्याने जात, त्यावेळी एक तरुण मुलगी त्यांना भिक्षा वाढताना, त्यांच्या मादक डोळ्यांवर लुब्ध होऊन रेंगाळत त्यांच्याशी प्रेमाचे हावभाव, बोलणे करु लागली. हरिचिंतनात मग्न सूरदासांना ते असाह्य झाले. एक दिवस दोन दाभण बरोबर घेऊन भिक्षा मागायला बाहेर पडले. रोजच्या प्रमाणे त्या मुलीने भिक्षा वाढताना प्रेमगोष्टी सुरु करताच सूरदासांनी आणलेले दाभण बाहेर काढले आणि त्या मुलीला म्हणाले ''माई या डोळ्यांवर तू एवढी भाळली आहेस की तुला स्वत:च्या शीलाचेही भान उरले नाही, तेव्हा ते कारणच मी नाहीसे करतो!''असे म्हणून त्यांनी दोन्ही दाभणे स्वत:च्या डोळ्यात खुपसून घेतली! रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या! ती तरुण मुलगी भेदरुन किंचाळत घरात पळाली. सूरदासांनी कायमचे अंतर्मुख होण्याकरिता बाह्य दृष्टीचा कायमचा त्याग केला! ते पूर्णपणे विरक्त होऊन अठराव्या वर्षीच घर सोडून मथुरा-आग्रा दरम्यानच्या 'गऊघाट' नावाच्या गावी येऊन कायमचे राहू लागले. 'भाव -प्रकाश' या ग्रंथात त्यांच्याबद्दल अनेक चमत्कृतीपूर्ण गोष्टी लिहील्या आहेत.

सूरदास एक विरक्त स्वामी म्हणून गऊघाटला प्रसिद्धीस आले व त्यांना अनेक शिष्यही मिळाले. पदरचना व संगीत याबद्दल त्यांची ख्याती दूरवर झाली. त्यांचा भक्तिभाव हा दास्यभक्तीचा होता गऊघाटलाच प्रसिध्द महाप्रभू वल्लभाचार्य यांच्याशी त्यांचा संबंध आला. वल्लभाचार्यांच्या वात्सल्य व सख्यभक्तीच्या मार्गावर ते एवढे भाळले की त्यांनी वल्लभाचार्यांच्या पुष्टि मार्गाची दिक्षा घेतली व गऊघाट सोडून ते गोवर्धनला आले. तिथे नाथजींच्या मंदिरात व कधीकधी गोकुळवृंदावनातल्या नवनीत प्रियाजी मंदिरात भजने, पदे रचून हरिकीर्तनात ते रंगून जात. इथेच हरिभजनांत त्यांचे उर्वरित आयुष्य गेले.

सूरदास शंभरी ओलांडून गेल्यावर, श्रीकृष्णाची रसभूमी 'परासोली' गावात महाप्रभू वल्लभाचार्यांचे सुपुत्र व उत्तराधिकारी श्री विठ्ठलनाथजी यांचे समक्ष हरिकीर्तन करता करता अनंतात विलीन झाले

महाकवी संत सूरदासांच्या सर्व रचनांत 'सूरसागर' हा श्रेष्ठ ग्रंथ मानला जातो.त्यांनी सव्वालाख पदे रचली अशी दंत कथा आहे. सूरदासांनी श्रीकृष्ण, राम, दत्त, अजामिळ व दशावतारावर पदे रचली आहेत पण सर्वात काव्य, भावभक्तिच्या दृष्टिकोनातून श्रीकृष्णाच्या गोकुळातील लीलांवरची त्यांची पदे अप्रतीम आहेत.जनमानसात त्यांना फार उच्च स्थान मिळालेले आहे, श्रीमतभगवतगीतेच्या दशम स्कंधातील गोकुळ वृंदावन लीलांची वर्णने सूरदासांच्या प्रतिभेने सारे अंधत्व झुगारुन देऊन, डोळयापेक्षाही अधिक सूक्ष्म व बहारदार रितीने, आपल्या अमृतरसाने ओथंबवणाऱ्या भाषेत केली आहेत. त्यांचे काव्य

वाचताना आपली कुंडलिनी सहस्त्रारात येऊन थंड थंड चैतन्य लहरी जाणवतात. त्यांच्या काही काव्य संग्रहाती पुढील प्रमाणे :-

'अब मै नाच्यों बहुत गोपाल ।
काम क्रोध को पहिरी चोलना ।
कंठ विषय की माल ।
महामोह के नूपुर बाजत, निदासव्द रसाल।
भ्रमभयौ मन भयौ पखावज, चलत असंगत-चाल ।
तृष्णानाद करति घट भीतर, नाना विधि दै ताल ।
माया को कटि फेटा बांध्यो, लोभ तिलक दियौ भाल।
कोटिक कला काछि दिखराई, जलथल सुधि नहिं काल ।
सूरदास की सबै अविद्या, दूरी करौ नंदलाल ॥

हे गोपालकृष्णा, या संसारात मी एवढा बेभान झालो आहे कि कामक्रोधाचा चोळणा घालून, गळ्यात विषयलोलुपतेची माळ घालून मी नाचत सुटलो आहे. महामोहाचे घुंगरु-नुपूर माझ्या पायात बांधले आहेत. परनिंदेच्या शब्दांत मला गोडवा भासतो आहे. त्या तालावर मी बेतालपणानं नाचत सुटलो आहे: डोक्यावर मायेचा फेटा बांधून व कपाळावर लोभाचा तिलक लावून, नाना तऱ्हेने काळावेळाचं भान सुटून मी या मोहनृत्यात गुंगून गेलो आहे. हे नंदलाला, संसारात फसलेल्या या अंध सूरदासाची ही सगळी अविद्या तूच दूर करुन, त्याला आपल्या जवळ घेऊन, शुध्दीवर आण आणि तूच ते करु शकशील.

( माझी भैतिक सुख प्राप्तीची ओढ कमी कर )

तातै सेईयै श्री जदुराई ।
संपति बिपति, बिपति तै संपति, देह को यहै सुभाई ।
तरुवर फुलै, फरै, पतझरै, अपने कालहि पाई ।
सरवर नीर भरै, भरि उमडै, सूखे खेह उडायी ।
दुतिया चंद बढत ही बाढै, घटत घटत घटि जाई
सूरदास संपदा आपदा, जिनि कोउ पतिआई ॥

तू आपला हरीचं भजन करीत रहा. जगाच्या या रहाटगाडग्यात कधी संपत्ती-सुख वाट्याला येईल तर कधी विपत्ती-दुःख भोगावे लागेल. दुःखानंतर पुन्हा सुख संपत्ती लाभेल. या देहाला, संसाराला तेच शोभते. झाडांवर फुले येतात, फळे लागतात व शेवटी कालमानानं पडून जातात. सरोवरात पावसाळ्यात पाण्याचे लोट येऊन ते दुथडी वाहू लागतं, नंतर उन्हाळ्यात सगळं पाणी आटून जाऊन त्याच सरोवरात शुष्क जमीन दिसू लागून धूळ उडू लागते. द्वितीयेपासून दर दिवशी कलेकलेनं चंद्र मोठामोठा होत पोर्णिमेला त्याची पूर्ण वाढ होते नि दुसऱ्या दिवसापासून कलेकलेन घटताघटता अमावस्येला दिसेनासा होतो. सूरदास म्हणतात, जीवनात संपत्ती-विपत्ती उन्हाळे पावसाळे जसे येतील तसे त्यांना 'साहोनी जावे ' असे आपल्या वृतीला वळण लावावे.

(सृष्टीच्या कालचक्रात अडकून न पडता आत्मसाक्षात्कार प्राप्त करण्याचा मार्ग शोध)

''एक प्रान द्वै देह है, द्विविधा नहिं यामें ।
गर्व कियो नरदेह तै, मै रहों, न तामें ॥
सुरज-प्रभु अंतर भए, संग तजि प्यारी ।
जहँ की तहँ ठाढी रही, वह घोषकुमारी ॥

भगवंताशी तुम्ही एवढे एकरुप होऊन जा की तुमचं आणि भगवंताचं बाह्यरुप वेगळं असलं तरी आत्मरुप एकच होऊन जाईल. तुमच्या जगात, संसारात जे जे तुम्हाला आवडतं, प्रिय वाटतं सर्वात जास्त तुमचा 'अहं' तुम्हाला प्यारा, (अहंकार)त्यामुळे तो सोडायला अत्यंत कठीण; पण त्याचाही त्याग करण्याचं बळ हरीकृष्ण कृपेने मिळवाल तर हरीत आणि तुमच्यात द्वैत उरणार नाही.

(आपल्या कुंडलिनीला सहस्त्रार पार करावयाचे असल्यास आज्ञाचक्रावर सर्वांना क्षमा करणे आवश्यक असून अहंकार नष्ट होणे आवश्यक आहे.)













